सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर
सोमवार, दि. ८ जून २०२६ | वर्ष – ४ थे | अंक ५५ | पाने : ८ + ४ | किंमत रु. ६/–
dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# राज्यात पावसाचा लपंडाव वाढविणार शेतकऱ्यांची चिंता !

तभा वृत्तसेवा

मुंबई : महाराष्ट्रात मान्सून दाखल झाला, या वृत्ताने राज्यातील शेतकऱ्यांच्या आयुष्यात उषःकाल आला, असं वाटत होतं. पण असं वाटत असतानाच उषःकाल होता होता काळरात्र झाली, असं म्हणण्याची वेळ आली आहे.





कारण मान्सून दाखल झाला असला तरी १५ जूनपर्यंत तरी तो जोर धरेल याची शक्यता आता धुसर झाली आहे. यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत महत्त्वाची माहिती दिली आहे. मान्सून दक्षिण कोकणात दाखल झाला असून सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यांतील काही भागांमध्ये ९ जूनपर्यंत मध्यम ते जोरदार पावसाचा अंदाज आहे. मात्र त्यानंतर किमान १५ जूनपर्यंत राज्यातील पावसाचा एकंदरीत जोर तसेच मान्सूनच्या प्रगतीचा वेग कमी होण्याची शक्यता हवामानाच्या सध्याच्या अंदाजातून दिसून येत आहे. त्यामुळे या कालावधीत राज्यात सर्वत्र समाधानकारक पावसाची शक्यता कमी आहे, अशी माहिती मुख्यमंत्री कार्यालयाकडून देण्यात आली आहे. सध्याच्या हवामान अंदाजानुसार किमान १५ जूनपर्यंत विदर्भ, मराठवाडा, खानदेश, आणि मध्य महाराष्ट्रातील काही भागांमध्ये दुपारनंतर ढग आणि विखुरलेल्या स्वरूपाचा मेघगर्जनेसह वादळी पाऊस पडण्याची शक्यता आहे.

तथापि, हा पाऊस व्यापक क्षेत्रात पेरणीस पोषक ठरेल, अशी परिस्थिती अद्याप दिसत नाही, अशी माहिती मुख्यमंत्री कार्यालयाकडून देण्यात आली आहे. किमान १२ जूनपर्यंत राज्यातील अनेक भागांमध्ये कमाल तापमान सध्याप्रमाणेच उच्च राहण्याची शक्यता आहे. विदर्भ आणि खानदेशात कमाल तापमान ४० अंश सेल्सिअसपेक्षा अधिक, तर मराठवाड्यात ३५ ते ४० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याचा अंदाज आहे, अशी माहिती देण्यात आली आहे. कृषी व आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून शेतकरी आणि नागरिकांना महत्त्वाचं आवाहन करण्यात आलं आहे. आगामी वादळी पावसावर अवलंबून राहून पेरणीची घाई करू नये. विजांच्या कडकडाटाच्या वेळी झाडाखाली, टिन शेड खाली तसेच विद्युत ट्रान्सफॉर्मर, वीज खांब आणि विद्युत वाहिन्यांच्या जवळ थांबणे टाळावे, असं आवाहन नागरिकांना करण्यात आलं आहे.अल निनोचं वर्ष आहे. सरासरीपावसाचा अंदाजहा ९२ टक्के असला तरीदेखील विशेषतः मराठवाडा, पश्चिम विदर्भातील काही जिल्हे, उत्तर महाराष्ट्रातील काही जिल्हे आणि आपल्या आवर्षणप्रवळ भाग या भागांमध्ये त्यापेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता आहे. म्हणूनच मी शेतकऱ्यांना सातत्याने सूचना देत आहे की, त्यांनी पेरणी कधी केली पाहिजे, जेणेकरुन दुबार पेरणीची गरज लागणार नाही. प्रयत्न आहेत की, कमी पावसातही जेवढं कमीत कमी नुकसान होईल तसा प्रयत्न केला जातोय, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री यांनी दिली.

# पुण्यातील वाहतूक कोंडी होणार दूर!

तभा वृत्तसेवा

पुणे : 'शहरातील वाहतूक कोंडीवर उपाययोजना करण्यासाठी वाहतूक पोलिसांनी तंत्रज्ञान, तज्ज्ञ सल्ला आणि नागरिकांचा सहभाग अशी त्रिसूत्री स्वीकारली आहे. शहरात लवकरच 'कृत्रिम बुद्धिमत्ते'वर (एआय) आधारित ५०० कॅमेरे बसविण्यात येणार असून, मुंबईच्या धर्तीवर अत्याधुनिक वाहतूक नियंत्रण प्रणाली कार्यान्वित केली जाणार आहे,' अशी माहिती अतिरिक्त पोलिस आयुक्त मनोज पाटील यांनी दिली.

पुणे शहर जिल्हा काँग्रेसच्या पश्चिम विभागाच्या अध्यक्षा दीप्ती चवधरी यांच्या वतीने 'पुणे ट्रॅफिक परिषदेचे' आयोजन करण्यात आले होते. या वेळी पाटील यांनी शहरातील कोंडी आणि त्यावरील उपाय योजनांची माहिती दिली. शहर वाहतूक उपायुक्त संदीप भाजीभाकरे, पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या (पीएमपी) सह-व्यवस्थापकीय संचालक लिस पोरे, दीप्ती चवधरी, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी सुरेंद्र निकम, पुणे मेट्रोचे अधिकारी मिहीर कुलकर्णी, हृदयरोगतज्ज्ञ डॉ. राहुल सावंत, पत्रकार मंगेश कोळपकर, काँग्रेसचे नेते गोपाळ तिवारी उपस्थित होते. 'पुण्याची वाहतूक कोंडी ही आता केवळ रस्त्यांची समस्या उरलेली नाही, तर ती नागरिकांच्या आरोग्याशी आणि मानसिक तणावाशी जोडली गेली आहे. 'एआय' कॅमेरे वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर मानवी हस्तक्षेपाशिवाय थेट आणि स्वयंचलित दंडात्मक कारवाई करतील. वाहतुकीचे स्वयंचलित नियमन करण्यासाठी 'इंटेलिजंट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टीम'चा (आयटीएमएस) प्रकल्प वाहतूक शाखेने तयार केला आहे. 'आयटीएमएस'चा अहवाल मंजुरीसाठी सरकारकडे पाठवण्यात आला आहे.

आगामी काळात उभे राहणारे १०० किलोमीटरचे मेट्रोचे जाळे आणि पोलिसांची आधुनिक यंत्रणा यामुळे वाहतुकीचा प्रश्न नक्कीच सुटेल,' असा विश्वासही पाटील यांनी व्यक्त केला.

## वैद्यकीय असुविधेचा असाही फटका

अकोला : अकोला येथील शासकीय वैद्यकीय रुग्णालयात (जीएमसी) रुग्णांच्या सोयीसाठी असलेल्या रुग्णवाहिकांची कमतरता असल्यानं रुग्णांना अनेक अडचणींना सामोरं जावं लागत आहे. नुकत्याच एका आदिवासी महिलेनं आपल्या आजारी पतीला पाठीवर घेऊन रुग्णालयात भटकंती केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.या महिलेनं आपल्या पतीला उपचारासाठी जीएमसीत आणलं होतं. तिचा पती खूप आजारी असुन त्याला चालताही येत नव्हतं. महिला आपल्या पतीला रुग्णालयात घेऊन आली, परंतु तिला रुग्णालयाच्या परिसरात रुग्णवाहिका मिळाली नाही.

## तर्री पोह्याचा विश्व विक्रम

नागपूर : नागपूरच्या खाद्यसंस्कृतीची ओळख बनलेला तर्री पोहा आता जागतिक स्तरावर झळकला आहे. जागतिक पोहा दिनानिमित्त प्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर यांनी तब्बल ३ हजार किलो तर्री पोहा तयार करून विश्वविक्रमाची नोंद केली. बजाज नगर येथील 'विष्णुजी की रसोई' येथे रविवारी सकाळी हा अनोखा उपक्रम पार पडला. या विक्रमी प्रमाणात तयार करण्यात आलेल्या तर्री पोह्याचे नागरिकांना वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे नागपूरच्या पारंपरिक खाद्यसंस्कृतीचा गौरव झाला असून टर्री पोह्याची ओळख देशासह जगभर पोहोचवण्याचा प्रयत्न करण्यात आला.

## अल्पवयीन मुलीचा विनयभंग

बीड : माझ्यासोबत पळून नाही आलीस तर तुझ्या मामांना, आजी आजोबाला जिवंत सोडणार नाही. तुझे फोटो व्हायरल करील असे म्हणत एका १४ वर्षीय अल्पवयीन मुलीचा विनयभंग व पाठलाग करून धमकी दिल्या प्रकरणी परळी येथील ग्रामीण पोलीस ठाण्यात एका युवका विरुद्ध पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपीला अटक केली असल्याची खळबळ जनक घटना समोर आली आहे.

## गॅस टँकर उलटला

पालघर : मुंबई-गुजरात महामार्गावर पालघर हद्दीत रविवारी दुपारी एक गॅस टँकर अपघातग्रस्त होऊन रस्त्याच्या कडेला असलेल्या खोल भागात उलटल्याची घटना घडली. अपघातानंतर टँकरमधून काही प्रमाणात गॅस गळती सुरू झाल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. संभाव्य धोका लक्षात घेऊन पोलीस व आपत्कालीन यंत्रणा तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या.

## फुटबॉल 'ट्रायोंडा' चे अनावरण

नवी दिल्ली : फुटबॉल चाहत्यांसाठी एक मोठी बातमी! फिफा आणि ॲडिडासने २०२६ च्या आगामी विश्वचषकासाठी अधिकृत फुटबॉल 'ट्रायोंडा' अधिकृतपणे लाँच केला आहे. केवळ ४ पॅनेलची रचना आणि इन-बिल्ट मायक्रोचिप तंत्रज्ञान असलेला हा चेंडू फुटबॉलच्या इतिहासातील एक क्रांती मानला जात आहे. 'ट्रायोंडा' हा शब्द स्पॅनिश भाषेतील 'थ्री वेव्स' (तीन लाटा) यावर आधारित आहे. २०२६ च्या विश्वचषकाचे यजमानपद भूषवणारे कॅनडा, मेक्सिको आणि युनायटेड स्टेट्स या तीन देशांच्या एकतेचे हे प्रतीक आहे. चेंडूवर कॅनडाचे 'मॅपल लीफ', मेक्सिकोचा 'गरुड' आणि अमेरिकेचे 'तारे' यांचे सुंदर चित्रण करण्यात आले आहे. पांढऱ्या बेसवर लाल, हिरव्या आणि निळ्या रंगांच्या लाटा या तीन देशांच्या ध्वजांचे आणि संस्कृतीचे प्रतिनिधित्व करतात.

# आता परीक्षा केंद्रावर दीड तास आधी पोहोचणे अनिवार्य
# एमपीएससीकडून नवीन नियमावली जाहीर

तभा वृत्तसेवा




नागपूर : महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षांच्या शिस्तपालनासाठी आयोगाने कडक पावले उचलली आहेत. आगामी रविवार, १४ जून २०२६ रोजी होणाऱ्या महाराष्ट्र गट-ब अराजपत्रित सेवा संयुक्त पूर्व परीक्षेसाठी आयोगाने नवीन आणि कठोर नियमावली जाहीर केली आहे. आता उमेदवारांना परीक्षा केंद्रावर नियोजित वेळेच्या दीड तास आधी उपस्थित राहणे बंधनकारक असणार आहे.परीक्षा सुरू होण्यापूर्वी किमान दीड तास (९० मिनिटे) आधी परीक्षा उपकेंद्रावर पोहोचणे अनिवार्य आहे.प्रत्यक्ष परीक्षा सुरू होण्याच्या वेळेपूर्वी एक तास आधी स्वतःच्या बैठक क्रमांकावर उपस्थित राहणे गरजेचे आहे.

विहित वेळेनंतर कोणत्याही परिस्थितीत उमेदवाराला परीक्षा कक्षात प्रवेश दिला जाणार नाही. अशा स्थितीत होणाऱ्या नुकसानीस आयोग जबाबदार राहणार नाही.आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळावरून डाऊनलोड केलेले मूळ प्रवेश प्रमाणपत्र सोबत आणणे अनिवार्य आहे. त्याशिवाय प्रवेश नाकारला जाईल.परीक्षांच्या दिवशी आंदोलने, वाहतूक कोंडी किंवा अतिवृष्टीसारख्या समस्या उद्भवू शकतात, हे लक्षात घेऊनच विद्यार्थ्यांनी वेळेपूर्वी निघणे गरजेचे आहे.

आयोगाच्या सूचनांचे उल्लंघन केल्यास संबंधित उमेदवारावर ठराविक कालावधीसाठी किंवा कायमस्वरूपी परीक्षेला बसण्यावर बंदी घातली जाऊ शकते.

# अभियंत्याची हत्या

तभा वृत्तसेवा

सातारा : सातारा जिल्ह्यातील कराड शहरात एका शासकीय अभियंत्याची हत्या करण्यात आल्याची माहिती समोर आली. या घटनेनंतर जिल्ह्यात एकच खळबळ उडाली होती. या हत्येमागील सर्वांनाच हादरवून टाकणारं सत्य समोर आले आहे. सुरुवातीला अपघात वाटणाऱ्या या घटनेचा तपास करताना पोलिसांनी हा नियोजित खून असल्याचा दावा केला आहे. या प्रकरणात मृत अभियंत्याच्या जवळच्या नातेवाईकाला अटक करण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार,लक्ष्मण श्रीरंग मंडले (वय ४५) हे ठाणे जिल्ह्यातील शहापूर येथे जलसंधारण विभागात अभियंता म्हणून कार्यरत होते. सलग सुट्टी असल्याने ते ठाण्याहून कराडला घरी येत होते. शनिवारी पहाटे ते कराडमध्ये उतरून घराकडे जात असताना एका कारने त्यांना जोरदार धडक दिली.

# शरीरात लपवून सोन्याची तस्करी

तभा वृत्तसेवा




मुंबई विमानतळावरुन ५ कोटींचं सोनं जप्तमुंबईः मुंबई...मुंबई ही आपल्या देशाची आर्थिक राजधानी असल्यानं मुंबईत रोज कुणी ना कुणी आपलं पोट भरण्यासाठी येत असतं. या शहराला 'स्वप्नांचं शहर' देखील म्हटलं जातं. या शहरात दररोज अब्जावधींची उलाढाल होत असते, त्यामध्ये अवैध धंदे, तस्करी, आंतरराष्ट्रीय गुन्हेगारीच्याही घटना समोर येतात. याचदरम्यान, 'ऑपरेशन गोल्डन नेक्सस' अंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर डीआरआयने सोन्याच्या तस्करीच्या मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश केला आहे. डीआरआयच्या मुंबई विमानतळावरील कारवाईतसुमारे ३.२ किलो परदेशी सोन्याची पावडर जप्त करण्यात आली असून त्याची किंमत अंदाजे ५ कोटी रुपये आहे.

या प्रकरणात ३ बांगलादेशी व श्रीलंकन नागरिक, ३ विमानतळ कर्मचारी आणि १ रिसिव्हर अशा एकूण ७ जणांना अटक करण्यात आली आहे. डीआरआयच्या माहितीनुसार, हे सोनं बँकॉकहून मुंबईमार्गे प्रवास करणारे परदेशी नागरिक शरीरात लपवून आणत होते. विमानतळावरील काही कर्मचारी हे सोनं बाहेर काढून स्थानिक एजंटांकडे पोहोचवत होते. कारवाईदरम्यान दोन बसचालक आणि एका कोच मॉनिटरला सोन्याची डिलिव्हरी करताना पकडण्यात आलं.दरम्यान, कस्टम्स कायदा १९६२ अंतर्गत सोनं जप्तीची कारवाई करण्यात आली असून संपूर्ण तस्करी साखळी उद्ध्वस्त करण्यात डीआरआयला यश आलं आहे. याप्रकरणी, अधिक तपास सुरू असून, हे सोनं नेमकं कुठे जाणार होतं?कुठून आलं होतं? याबाबत सखोल चौकशी सुरू आहे.

# गॅस दरवाढीवरून पवारांची सरकारवर टीका

तभा वृत्तसेवा



मुंबई : घरगुती गॅस सिलिंडरच्या दरात २९ रुपयांची वाढ झाल्यानंतर केंद्र सरकारवर विरोधकांनी टीकेची झोड उठवली आहे. या दरवाढीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे नेते शरद पवार यांनीही सरकारवर निशाणा साधत महागाईचा सर्वाधिक फटका सामान्य कुटुंबांना बसत असल्याचे म्हटले आहे.

वाढत्या इंधनदरांचा परिणाम थेट घरगुती खर्चावर होत असून त्यांनी पंतप्रधान मोदींच्या नीतीवर यावेळी भाष्य केलं, या महागाईची राजकीय किंमत सत्ताधाऱ्यांना भविष्यात चुकवावी लागू शकते, असा इशाराही त्यांनी दिला. दरवाढीबाबत बोलताना शरद पवार म्हणाले की, प्रधानमंत्र्यांनी सुरुवातीला आम्ही महागाई नियंत्रित ठेवतोय, असं सांगितलं. पण, नियंत्रित याचा अर्थ टप्प्या टप्प्यानं हा धक्का द्यायचा हे त्यांचं सूत्र आहे, महागाई नियंत्रणात असल्याचा दावा केला जात असला तरी प्रत्यक्षात दरवाढ केली जात आहे. या निर्णयांचा परिणाम सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर होत असून घरखर्चाचे गणित बिघडत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये नाराजी वाढत असल्याचेही त्यांनी नमूद केले.तेल विपणन कंपन्यांनी ७ जूनपासून घरगुती एलपीजी सिलिंडरच्या दरात २९ रुपयांची वाढ लागू केली आहे.

त्यानुसार १४.२ किलोच्या सिलिंडरसाठी दिल्लीत आता ९४२ रुपये मोजावे लागत आहेत. मुंबईत सिलिंडरचा दर ९४१.५० रुपयांवर पोहोचला आहे. याशिवाय कोलकाता, चेन्नई आणि बेंगळुरू या शहरांमध्येही नव्या दरांची अंमलबजावणी करण्यात आली आहे.यापूर्वी ७ मार्च रोजी घरगुती गॅस सिलिंडरच्या दरात ६० रुपयांची वाढ करण्यात आली होती. त्यानंतर आता पुन्हा २९ रुपयांची वाढ झाल्याने अवघ्या दोन ते तीन महिन्यांच्या कालावधीत सिलिंडर जवळपास ९० रुपयांनी महागला आहे. त्यामुळे गृहिणींसह मध्यमवर्गीय कुटुंबांचे मासिक बजेट पुन्हा एकदा कोलमडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्चे तेल आणि इंधनाच्या किमती वाढल्याने तेल कंपन्यांवरील आर्थिक दबाव वाढला आहे. घरगुती गॅस विक्रीत सातत्याने तोटा होत असल्याचे कंपन्यांचे म्हणणे आहे. त्याच पार्श्वभूमीवर ही दरवाढ करण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

# अमेरिका-इराण चर्चेदरम्यान पाकिस्तानचे गृहमंत्री विशेष संदेश घेऊन तेहरानमध्ये दाखल

वृत्तसंस्था

तेहरान : पाकिस्तानचे गृहमंत्री मोहसिन नकवी पुन्हा एकदा तेहरान दौऱ्यावर पोहोचले आहेत. फील्ड मार्शल आसिम मुनीर आणि पंतप्रधान शहबाज शरीफ यांचा संदेश पोहोचवण्यासाठी ते इराणला गेले आहेत. पाकिस्तानच्या सर्वोच्च नेतृत्वातील महत्त्वाचे नेते मानले जाणारे नकवी, इराण-अमेरिका संघर्ष सुरू झाल्यापासून तिसऱ्यांदा इराणला भेट देत आहेत.



इराणच्या वृत्तसंस्थेच्या माहितीनुसार, मोहसिन नकवी हे पाकिस्तानचे लष्करप्रमुख आसिम मुनीर आणि पंतप्रधान शहबाज शरीफ यांच्याकडून मोज्तबा खामेनेई यांना एक विशेष पत्र सुपूर्द करण्यासाठी तेहरानला पोहोचले आहेत. नकवी यांनी सांगितले, मी पाकिस्तानचे लष्करप्रमुख आणि पंतप्रधान यांच्याकडून मोज्तबा खामेनेई यांच्यासाठी विशेष पत्र घेऊन इराणमध्ये आलो आहे. या दौऱ्यात त्यांची इराणच्या वरिष्ठ नेतृत्वासोबतही महत्त्वपूर्ण बैठक होणार असल्याचे वृत्त आहे.

मोहसिन नकवी यांचा हा दौरा अशा वेळी होत आहे, जेव्हा अमेरिका आणि इराण यांच्यातील चर्चा अत्यंत नाजूक टप्प्यावर पोहोचली आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प सातत्याने इराणी नेतृत्वावर दबाव टाकत असून, समृद्ध युरेनियम इराणबाहेर हलवण्याची अटही त्यांनी घातली आहे.

दरम्यान, अमेरिकेत पाकिस्तानच्या मध्यस्थीच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. पाकिस्तानकडून अमेरिका आणि इराण या दोन्ही देशांच्या नेतृत्वाशी सतत संपर्क ठेवला जात आहे. आसिम मुनीर आणि शहबाज शरीफ हे डोनाल्ड ट्रम्प, मार्को रुबिओ आणि जेडी व्हान्स यांच्याशी नियमित संवाद साधत आहेत. त्याचबरोबर इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेजेशकियन आणि परराष्ट्रमंत्री अब्बास अराघची यांच्याशीही चर्चा सुरू आहे. मात्र, अद्याप कोणताही ठोस निष्कर्ष समोर आलेला नाही. त्यामुळे दोन्ही देशांमध्ये मध्यस्थी करण्याच्या पाकिस्तानच्या प्रयत्नांना अपेक्षित यश मिळताना दिसत नाही.

# इस्रायलकडून हिजबुल्लाहच्या १५० ठिकाणांवर भीषण हल्ले; ब्रिगेडियर जनरल, कॅप्टनसह १२ जणांचा मृत्यू

वृत्तसंस्था



जेरुसलेम : इस्रायलच्या सैन्याने दक्षिण लेबनानमध्ये हिजबुल्लाहच्या सुमारे १५० ठिकाणांवर भीषण हवाई हल्ले केले आहेत. मध्यस्थीच्या चर्चांना वेग आला असतानाही इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू माघार घेण्याच्या भूमिकेत नसल्याचे दिसत आहे. अमेरिकेच्या मध्यस्थीने झालेल्या चर्चेनंतर दोन्ही बाजूंमध्ये अटींसह युद्धविरामावर सहमती झाल्याच्या काही दिवसांतच दक्षिण लेबनानमध्ये झालेल्या इस्रायली हल्ल्यांमध्ये किमान १२ जणांचा मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये लेबनानी सैन्याचे वरिष्ठ अधिकारीही आहेत. लेबनानच्या सैन्याने दिलेल्या माहितीनुसार, खारदाली-नबातियेह मार्गावर लष्करी वाहनावर इस्रायलने केलेल्या हल्ल्यात एका ब्रिगेडियर जनरल, एका कॅप्टन आणि एका सैनिकाचा मृत्यू झाला. दुसरीकडे, इस्रायली सैन्याने हा हल्ला सक्रिय युद्ध-क्षेत्रात करण्यात आल्याचे म्हटले आहे. लेबनानी सैन्याने आरोप केला की, इस्रायलकडून वारंवार आणि जाणीवपूर्वक केले जाणारे आक्रमण कोणत्याही शांततापूर्ण तोडग्यापर्यंत पोहोचण्याच्या सर्व प्रयत्नांना हाणून पाडण्याच्या उद्देशाने केले जात आहे.लेबनानचे राष्ट्राध्यक्ष जोसेफ औन यांनी या हल्ल्याचा तीव्र निषेध करताना तो लेबनानच्या सार्वभौमत्वाचे तसेच आंतरराष्ट्रीय कायदे आणि नियमांचे गंभीर उल्लंघन असल्याचे म्हटले आहे. तसेच, लेबनानचे पंतप्रधान नवाफ सलाम यांनीही या कारवाईचा निषेध नोंदवला आहे. एका निवेदनात पंतप्रधान नवाफ सलाम यांनी ब्रिगेडियर जनरल वस्साम सबरा, कॅप्टन एली खौरी आणि सैनिक हुसेन गोजल यांच्या कुटुंबीयांप्रती तसेच लेबनानी सैन्याप्रती शोकसंवेदना व्यक्त केल्या आहेत.

यापूर्वीही इस्रायलच्या हवाई दलाने लेबनानमधील पूर्वेकडील बेका खोरे आणि हिजबुल्लाहशी संबंधित इतर ठिकाणांवर हल्ले केले होते. इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी लेबनानमधील दहशतवादी गटांवरील कारवाया आणखी तीव्र करण्याचा निर्धार व्यक्त केला होता.तन्याहू यांची ही भूमिका अशा वेळी समोर आली होती, जेव्हा हिजबुल्लाहने अलीकडच्या आठवड्यांत दक्षिण लेबनान आणि उत्तर इस्रायलमधील इस्रायली सैन्याच्या ठिकाणांवर फायबर-ऑप्टिक तंत्रज्ञानयुक्त ड्रोनच्या साहाय्याने हल्ले केल्याचा दावा करण्यात आला होता.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com



सोयगाव - सावळदबारा तालुका सोयगाव येथील भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यांनी दि.७ रविवार रोजी भोकरदन येथे जाऊन माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांची घेतली सदिच्छा भेट

# क्रांती चौकात शिवराज्याभिषेक सोहळा जल्लोषात; हजारो शिवभक्तांनी केले शिवप्रभूंना अभिवादन

**तभा वृत्तसेवा**

छत्रपती संभाजीनगर, शिवराज्याभिषेक सोहळा समितीच्या वतीने क्रांती चौकात छत्रपती शिवाजी महाराजांचा ३५३ वा शिवराज्याभिषेक दिन सोहळा मोठ्या उत्साहात, पारंपरिक विधी आणि शिवकालीन वैभवाच्या साक्षीने साजरा करण्यात आला. संस्थापक अध्यक्ष तथा शिवसेना शहरप्रमुख बाळासाहेब थोरात यांच्या पुढाकारातून आयोजित या सोहळ्याला हजारो शिवभक्तांनी उपस्थित राहून शिवप्रभूंना अभिवादन केले.



छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयघोषाने, ढोल-नगाऱ्यांच्या निनादाने आणि मंत्रोच्चारांनी क्रांती चौक परिसर शिवमय झाला होता. महाराजांच्या पुतळ्यापासून कार्यक्रमस्थळापर्यंत भव्य पालखी मिरवणूक काढण्यात आली. भजनी मंडळाच्या टाळ-मृदंगाच्या गजरात आणि महिलांच्या फुगड्यांमुळे वातावरण भक्तिमय झाले. पवित्र गंगाजल तसेच विविध नद्यांचे आणि गडांवरील पाणी आणून पारंपरिक पद्धतीने दुग्धाभिषेक व जलाभिषेक करण्यात आला.

यावेळी शिवसेना नेते तथा माजी खासदार चंद्रकांत खैरे, आमदार अंबादास दानवे, खासदार डॉ. कल्याण काळे, उद्योजक मानसिंग पवार, सहसंपर्कप्रमुख विजयराव साळवे, भारतीय कामगार सेनेचे प्रभाकर मते पाटील, मनपा आयुक्त अमोल येडगे, नंदकुमार भोंबे, मनपा गटनेते गणेश लोखंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विधिवत शिवराज्याभिषेक सोहळा पार पडला.

सोहळ्याचे प्रमुख आकर्षण ठरले ते शिवकालीन युद्धकलेची प्रात्यक्षिके. कोल्हापूर येथील कलाकार आणि झी मराठीवरील प्रसिद्ध कलाकार संदीप जाधव यांच्या नेतृत्वाखाली तलवारबाजी, दांडपट्टा आणि विविध युद्धकौशल्यांचे सादरीकरण करण्यात आले. या प्रात्यक्षिकांमधून छत्रपती शिवाजी महाराजांचे शौर्य, युद्धनीती आणि पराक्रमाची ओळख नव्या पिढीला करून देण्यात आली.

मनपा शाळांमधील दहावी-बारावीतील गुणवंत विद्यार्थी तसेच शिवछत्रपती पुरस्कार विजेत्यांचा यावेळी गौरव करण्यात आला. शिवबा प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुधाकर कापरे यांच्या वतीने उपस्थितांना मिठाईचे वाटप करण्यात आले. आशा दातार यांच्या पुढाकारातून भजनी मंडळाची व्यवस्था करण्यात आली होती.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभिजीत देशमुख, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष किरण डोणगावकर, शहराध्यक्ष सय्यद आक्रम, पृथ्वीराज पवार, सचिन खैरे, संतोष जेजूरकर, दिग्विजय शेरखाने, ज्ञानेश्वर डांगे, गिरीश चपळगावकर, जयसिंग होलिये, ॲड. धर्मराज दानवे, अभिजित थोरात, सुभाष महाराज मुळे, सुनीता आऊलवार, आशा दातार, सुकन्या भोसले आदींसह मोठ्या संख्येने शिवभक्त उपस्थित होते.

गेल्या पाच वर्षांपासून सातत्याने आयोजित करण्यात येणाऱ्या या सोहळ्यात यंदाही शिवकालीन परंपरा, साहित्य, शस्त्रे, भालदार-चोपदार, नगारा पथक आणि ऐतिहासिक वातावरणाची प्रभावी मांडणी करण्यात आली. त्यामुळे उपस्थितांना प्रत्यक्ष शिवराज्याभिषेक सोहळ्याचा अनुभव मिळाला आणि संपूर्ण परिसर शिवमय झाला.

## प्राचीन वारसा जपण्यासाठी गलवाडा(अ) ग्रामस्थ सरसावले; मारुती मंदिराच्या जीर्णोद्धाराचा निर्धार



**तभा.वृत्तसेवा**

सोयगाव,दि.७ जून ; छत्रपती संभाजीनगर जिल्हा हा ऐतिहासिक,धार्मिक आणि पर्यटन स्थळांसाठी जगभर प्रसिद्ध आहे. वेरूळची कैलास लेणी,अजिंठा लेणी आणि घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग यांसारख्या जागतिक दर्जाच्या वारशासोबतच सोयगाव तालुक्यातही अनेक ऐतिहासिक आणि प्राचीन स्थळांचा ठेवा जपला गेला आहे.याच तालुक्यातील गलवाडा (अ) हे गाव आपल्या रहस्यमय इतिहासामुळे आणि सांस्कृतिक वारशामुळे विशेष ओळख निर्माण करत आहे.

अजिंठा डोंगररांगांच्या परिसरात वसलेल्या या गावाजवळ श्री रुद्रेश्वर महादेव लेणी तसेच वेताळवाडी राणीचा किल्ला ही ऐतिहासिक स्थळे आहेत.गावात विविध ठिकाणी खोदकामादरम्यान प्राचीन वस्तू,मूर्ती आणि धार्मिक अवशेष सापडल्याच्या घटना घडल्या आहेत.काही वर्षांपूर्वी प्रभू शंकराची पिंड आणि नंदीची मूर्ती आढळली होती,तर त्यानंतर विठ्ठल-रुक्मिणीच्या प्राचीन मूर्तीही सापडल्या. त्यामुळे गावातील ग्रामदैवत श्री मारुती मंदिराचे ऐतिहासिक महत्त्व अधिक अधोरेखित झाले आहे.

या पार्श्वभूमीवर ९ मे २०२६ रोजी गावातील नागरिकांची ऐतिहासिक बैठक पार पडली.बैठकीत ग्रामदैवत असलेल्या श्री मारुती मंदिराच्या जीर्णोद्धाराचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. गावाच्या प्राचीन वारशाला साजेसे हेमाडपंथी शैलीतील दगडी,भव्य आणि कलात्मक मंदिर उभारण्याचा संकल्प ग्रामस्थांनी केला आहे.

भावी पिढीला आपल्या संस्कृतीचा आणि इतिहासाचा ठेवा जतन करून देण्याच्या उद्देशाने गावातील प्रत्येक कुटुंब या उपक्रमात सहभागी झाले आहे.मंदिर उभारणीसाठी अंदाजे ३० ते ३५ लाख रुपयांचा खर्च अपेक्षित असून,आवश्यक निधीपैकी सुमारे ९० टक्के निधी जमा झाल्यानंतर प्रत्यक्ष बांधकामाला सुरुवात करण्याचे नियोजन आहे. ग्रामस्थांनी शेतकरी,व्यापारी,नोकरदार,सामाजिक व राजकीय क्षेत्रातील व्यक्तींना मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी सहकार्याचे आवाहन केले आहे.प्राचीन संस्कृती आणि धार्मिक वारसा जतन करण्यासाठी अशा ग्रामदैवतांच्या मंदिरांचे संवर्धन करणे ही काळाची गरज असल्याचे मत गावकऱ्यांनी व्यक्त केले.

## शिवराज्याभिषेक दिनी देवगिरी बँकेकडून क्रांती चौकात डिजिटल तापमान मापक बोर्डाचे लोकार्पण

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधत देवगिरी नागरी सहकारी बँकेच्या वतीने शहरातील क्रांती चौक येथे अत्याधुनिक डिजिटल तापमान मापक बोर्ड बसविण्यात आला. या बोर्डाचा लोकार्पण सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.



महाराष्ट्र राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, छत्रपती संभाजीनगरचे महापौर समीर राजुरकर तसेच स्थायी समितीचे सभापती अनिल मकरीये यांच्या हस्ते या डिजिटल बोर्डाचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी देवगिरी नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष किशोर शितोळे यांनी बँकेच्या विविध समाजोपयोगी उपक्रमांची माहिती देताना सामाजिक बांधिलकी जपत बँक सातत्याने लोकहिताचे प्रकल्प राबवत असल्याचे सांगितले. शहरातील नागरिकांना उपयुक्त ठरणारे उपक्रम राबविण्याचा बँकेचा प्रयत्न असल्याचे त्यांनी नमूद केले. क्रांती चौकासारख्या वर्दळीच्या ठिकाणी उभारण्यात आलेल्या या डिजिटल बोर्डाद्वारे नागरिकांना शहरातील तापमानाची अद्ययावत माहिती सहज उपलब्ध होणार आहे. यासोबतच हवेची गुणवत्ता निर्देशांक (AQI) आणि हवेतील आर्द्रता (Humidity) यासारखी महत्त्वाची माहितीही या बोर्डावर प्रदर्शित केली जाणार आहे. भविष्यात शहरातील अन्य प्रमुख चौकांमध्येही अशा प्रकारचे डिजिटल माहिती फलक उभारण्याचा मानस असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

या कार्यक्रमास बँकेचे संचालक नागनाथ काजळे, सुरेश जगाडे, जयश्री किवळेकर, डॉ. क्षमादेवी खोब्रागडे तसेच उपमुख्य कार्यकारी अधिकारी रूपेंद्र कोयाळकर यांची उपस्थिती होती. देवगिरी बँकेच्या या नागरिकाभिमुख उपक्रमाचे शहरवासीयांकडून स्वागत होत असून, आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून लोकांना उपयुक्त माहिती उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नाचे कौतुक केले जात आहे.

## देवस्थान विधेयक स्थगित; शासनाच्या निर्णयाचे स्वागत

### मुख्यमंत्री व महसूल मंत्र्यांचे विहिंपकडून अभिनंदन

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर :** राज्य शासनाने वादग्रस्त ठरलेला 'महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन प्रारूप अधिनियम, २०२६' स्थगित करून नव्या कायद्याच्या निर्मितीसाठी तज्ज्ञ समिती स्थापन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या निर्णयाचे विश्व हिंदू परिषद (विहिंप) तसेच राज्यातील विविध देवस्थान प्रतिनिधींनी स्वागत केले आहे. देवस्थानांचे हित, धार्मिक स्वायत्तता आणि सांस्कृतिक वारसा जपण्याच्या दृष्टीने शासनाने लोकभावना लक्षात घेऊन हा निर्णय घेतल्याचे सांगितले जात आहे. राज्यभरातून या प्रारूप अधिनियमाला विरोध होत असताना शासनाने सकारात्मक भूमिका घेत विधेयक स्थगित केले. विश्व हिंदू परिषदेचे क्षेत्र मंत्री रामचंद्र रामूका, मंदिर आयामाचे क्षेत्र प्रमुख अनिल सांबरे, देवगिरी प्रांत संपर्कप्रमुख राजीव जहागीरदार तसेच देवगिरी प्रांतातील मंदिर विश्वस्तांनी या निर्णयाबद्दल मुख्यमंत्री आणि महसूल मंत्र्यांचे अभिनंदन केले आहे. देवस्थानांचे अधिकार, परंपरा आणि अस्तित्व अबाधित राखण्यासाठी शासनाने उचललेले हे पाऊल स्वागतार्ह असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

शासनाने स्थापन केलेली तज्ज्ञ समिती विविध धार्मिक संस्था, कायदेतज्ज्ञ आणि देवस्थान प्रतिनिधींशी सल्लामसलत करून नव्या कायद्याचा मसुदा तयार करणार आहे. या निर्णयामुळे राज्यातील हजारो देवस्थानांना आणि लाखो भाविकांना मोठा दिलासा मिळाला असून धार्मिक क्षेत्रातून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

## घाटी रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांचा वाढदिवस साजरा

**तभा वृत्तसेवा**



**खुलताबाद प्रतिनिधी :** संतोष करपे छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयाच्या विकासात मोलाचे योगदान देणारे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांचा वाढदिवस विविध उपक्रम राबवून वृक्षारोपण, सामाजिक बांधिलकी जपणारे आणि जनहिताच्या कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला.

यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी यांच्या उपस्थित डॉ. सुक्रे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. त्यांच्या नेतृत्वाखाली घाटी रुग्णालयात झालेल्या विविध विकासकामांचा आणि रुग्णसेवेतील सकारात्मक बदलांचा गौरव करण्यात आला. वाढती रुग्णांची संख्या डॉक्टरांची अपुरी संख्या इतर कर्मचाऱ्यासह व त्यावरील मात करून येणाऱ्या प्रत्येक रुग्णांना सेवा देण्याचे काम आपण प्रामाणिकपणे आपल्या सहकार्यासह करत असल्याची प्रतिक्रिया डॉक्टर सुक्रे यांनी दिली.( मी मागील काही दिवसापूर्वी घाटी रुग्णालय येथे डोक्याच्या विलाजासाठी गेले असता त्या ठिकाणच्या अपघात विभागातील ओपीडीत संबंधित डॉक्टरांनी सिटीस्कॅन व काही तपासण्या करण्यासाठी सांगितल्या होत्या. परंतु त्या तात्काळ करणं गरजेचे होत्या परंतु पेशंटची अवस्था बघून शक्य नव्हते. त्याच वेळेस ओपीडी राऊंडसाठी आलेले घाटी अधिष्ठान डॉक्टर शिवाजी सुक्रे यांनी पेशंटची अवस्था बघून तात्काळ सिटीस्कॅन करून घेण्याची संबंधित डॉक्टरांना आदेशित केले. व काही अडचण आल्यास स्वतः मोबाईल नंबर देऊन त्यावर संपर्क करा किंवा मेसेज पाठवा असे सांगितले त्यामुळे माझ्यासारख्या सर्वसामान्य रुग्णाला दिलासा मिळाला. ही माझ्या आयुष्यातील घाटीतील अस्मरणीय आठवण राहील श्री ज्योती संतोष करपे खुलताबाद )

छत्रपती संभाजी नगर घाटी रुग्णालय या ठिकाणी उपचारासाठी येणाऱ्या प्रत्येक रुग्ण माझ्यासाठी व रुग्णालयातील जबाबदार संबंधितांसाठी महत्त्वाचा असून वृक्षारोपणासह पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत साजरा करण्यात आलेला हा वाढदिवस समाजाप्रती असलेल्या त्यांच्या बांधिलकीचे प्रतीक ठरला. डॉ. सुक्रे यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला

## तन्मय नागलोतची राज्यस्तरीय विज्ञान कार्यशाळा व इस्रो सहलीसाठी निवड

**तभा वृत्तसेवा**



**कन्नड :** दि.०७ जून - कन्नड तालुक्यासाठी अभिमानाची बाब ठरलेल्या राज्यस्तरीय डॉ. सी. व्ही. रमण बालवैज्ञानिक परीक्षा व कार्यशाळा २०२६ मध्ये गौताळा व्हॅली स्कूलचा वर्ग पाचवीचा विद्यार्थी तन्मय उदलसिंग नागलोत याने उल्लेखनीय यश संपादन करत तालुका गुणवत्ता यादीत द्वितीय क्रमांक मिळविला आहे. सदर परीक्षा दि.०६ एप्रिल रोजी पार पडली होती त्याचा निकाल जून महिन्यात प्रसिद्ध झाला. या यशामुळे त्याची विज्ञान कार्यशाळा व इस्रो सहलीसाठी निवड झाली आहे.

इयत्ता पाचवीत शिक्षण घेणाऱ्या तन्मयने लहान वयातच विज्ञान विषयातील आवड, जिज्ञासा आणि अभ्यासू वृत्तीच्या जोरावर हे यश मिळविले आहे. विशेष म्हणजे तनमयचे वडील उदलसिंग नागलोत हे कन्नड ग्रामीण पोलीस ठाण्यात कार्यरत असून त्यांच्या कर्तव्यनिष्ठा, शिस्त आणि मेहनतीचा वारसा मुलानेही जपल्याचे या यशातून दिसून येते. राज्यस्तरीय स्पर्धेत मिळविलेल्या या यशामुळे नागलोत कुटुंबासह कन्नड तालुक्याची मान उंचावली आहे. विज्ञान कार्यशाळा आणि इस्रो सहलीची संधी मिळाल्याने तन्मयला देशातील अवकाश संशोधन आणि विज्ञान क्षेत्राचा जवळून अभ्यास करण्याची संधी मिळणार आहे. तन्मयच्या या यशाबद्दल शैक्षणिक, सामाजिक आणि पोलीस वर्तुळातून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, भविष्यातही तो अशाच प्रकारे यशाची नवी शिखरे गाठेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## "संकल्प ते सिद्धी" अभियानासाठी भाजपाची जोरदार तयारी; विभागीय कार्यालयात नियोजन बैठक संपन्न

### मोदी सरकारच्या 12 वर्षांच्या विकासकामांची माहिती घराघरात पोहोचविण्याचा निर्धार

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारच्या यशस्वी १२ वर्षांच्या कार्यकाळानिमित्त देशभर राबविण्यात येणाऱ्या "संकल्प ते सिद्धी" अभियानाच्या अनुषंगाने भारतीय जनता पक्षाच्या विभागीय कार्यालयात महत्त्वपूर्ण नियोजन बैठक संपन्न झाली. या बैठकीत केंद्र सरकारच्या विविध जनकल्याणकारी योजना, विकासकामे आणि लाभार्थी संपर्क उपक्रम अधिक प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचविण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.



अभियानाच्या माध्यमातून केंद्र सरकारच्या विविध योजनांचा लाभ घेतलेल्या नागरिकांशी अधिक व्यापक संपर्क साधणे, लाभार्थी संवाद कार्यक्रमांचे आयोजन करणे तसेच आगामी काळात राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचे नियोजन यावर विशेष भर देण्यात आला. "संकल्प ते सिद्धी" अभियानाद्वारे मोदी सरकारच्या बारा वर्षांच्या विकास प्रवासाची माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

बैठकीत भाजपा प्रदेश सरचिटणीस सुनील राणे, खासदार डॉ. भागवत कराड, मराठवाडा विभाग संयोजक नितीन काळे, भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर तसेच शहर जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे यांनी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करणे, बूथस्तरापर्यंत पक्षाचा संपर्क वाढविणे आणि केंद्र सरकारच्या विकासकामांची माहिती प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचविण्यासाठी कार्यकर्त्यांनी सक्रिय भूमिका बजावावी, असे आवाहन मान्यवरांनी केले.

यावेळी जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे यांनी "संकल्प ते सिद्धी" अभियान यशस्वी करण्यासाठी शहरातील प्रत्येक बूथवर प्रभावी जनसंपर्क राबविण्यात येणार असून केंद्र सरकारच्या जनहितकारी योजनांचा लाभ आणि विकासकामांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी पक्षाचे कार्यकर्ते समर्पित भावनेने काम करतील, असा विश्वास व्यक्त केला.

बैठकीस शहरातील नगरसेवक, विविध आघाड्यांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि भाजपा सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. आगामी काळात अभियानाच्या माध्यमातून जनतेशी अधिक प्रभावी संवाद साधत विकासाची गाथा घराघरात पोहोचविण्यासाठी सर्वांनी एकजुटीने काम करण्याचा संकल्प केला. अभियानाच्या यशासाठी पक्ष संघटनेच्या सर्व स्तरांवर समन्वय साधून व्यापक जनसंपर्क मोहीम राबविण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

## एमजीएम विद्यापीठ आणि ग्रीव्ह्ज कॉटन यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थिनींसाठी मोफत पदविका अभ्यासक्रम सुरू

### विद्यार्थिनींना दिली जाणार १००% शिष्यवृत्ती

**छत्रपती संभाजीनगर, दि.७ :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी आणि ग्रीव्ह्ज कॉटनच्या पिगमेलियन फाऊंडेशन संयुक्त विद्यमाने महिला सक्षमीकरणाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण आणि दूरगामी पाऊल टाकत स्वाती (स्किल्स फॉर विमेन ॲडव्हान्समेंट अँड ट्रेनिंग इनिशिएटिव्ह) उपक्रमांतर्गत दोन वर्षांचा पदविका अभ्यासक्रम मोफत सुरू करण्यात आला आहे.



महिलांना उद्योग सुसंगत व्यावसायिक शिक्षण, रोजगारक्षम कौशल्ये तसेच उद्योजकतेच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी शिक्षणातील दर्जा, कॉर्पोरेट नेतृत्व आणि सामाजिक उत्तरदायित्व यांचा समन्वय साधण्यावर या पदविका अभ्यासक्रमात भर देण्यात येणार आहे.

या पदविका अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यासाठी महिला १२ वी उत्तीर्ण आणि १७ ते २५ वयोगटातील असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे या अभ्यासक्रमासाठी असलेले शुल्क शिष्यवृत्ती देऊन माफ करण्यात येणार असून यासाठी ६ लक्ष रुपयांच्या उत्पनाची अट असणार आहे. हा अभ्यासक्रम पूर्णपणे निवासी असणार असून राहणे, जेवण आणि इतर सर्व संबंधित बाबींचा खर्च काहीही असणार नाही.

या संवादात एमजीएम विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीच्या माध्यमातून अभ्यासक्रम निर्मिती, अनुभवाधारित शिक्षण, मार्गदर्शन आणि रोजगाराभिमुख संधी निर्माण करण्यात येणार आहे. विशेषतः दुर्लक्षित व वंचित घटकांतील महिलांना भविष्यासाठी सज्ज कौशल्ये, आत्मविश्वास आणि आर्थिक स्वावलंबन प्राप्त करून देण्याच्या दृष्टीने 'स्वाती' उपक्रमांतर्गत सुरू होणारा पदविका अभ्यासक्रम महत्वाची भूमिका पार पाडणार आहे. त्याचप्रमाणे या पदविका अभ्यासक्रमाच्या माध्यमातून सर्वसमावेशक विकास, महिलाकेंद्रित कौशल्यविकास आणि उद्योगसंलग्न शिक्षणाबाबतची ठाम बांधिलकी अधिक दृढ होण्यास मदत होणार आहे.

या उपक्रमाच्या संदर्भातील सामंजस्य करार ग्रीव्ह्ज कॉटन लिमिटेडचे अध्यक्ष करण थापर, एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ.हरिरंग शिंदे, संचालिका डॉ.परमिंदर कौर, ग्रीव्ह्ज कॉटनच्या शेफाली सुरी, पिगमेलियन फाऊंडेशनचे अर्पित आस्थाना, प्राध्यापक व सर्व संबंधित मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला.

## 'जगद्धात्री' मालिकेचा 200 भागांचा यशस्वी टप्पा; प्रेक्षकांच्या प्रेमाला कलाकारांची सलामी

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर :** झी टीव्हीवरील लोकप्रिय 'जगद्धात्री' मालिकेने यशस्वीपणे 200 भाग पूर्ण करत आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. वेगळ्या कथानकासह दमदार व्यक्तिरेखा आणि थरारक घटनांमुळे ही मालिका प्रेक्षकांच्या पसंतीस उतरली असून टीआरपीच्या शर्यतीतही आपले स्थान कायम राखत आहे. मालिकेची कथा जगद्धात्री या साध्या पण धाडसी महिलेभोवती फिरते. घरात जबाबदार सून म्हणून वावरणारी जगद्धात्री घराबाहेर मात्र एक निर्भय आणि बुद्धिमान अधिकारी म्हणून गुन्हेगारीविरोधात लढताना दिसते. तिच्या दुहेरी आयुष्यामुळे आणि भावनिक संघर्षांमुळे मालिकेला विशेष लोकप्रियता मिळाली आहे.



200 भाग पूर्ण झाल्याबद्दल आनंद व्यक्त करत अभिनेत्री सोनाक्षी बत्रा म्हणाली की, हा संपूर्ण टीमसाठी अभिमानाचा क्षण आहे. दिग्दर्शक, निर्माते, लेखक, तांत्रिक कर्मचारी आणि प्रेक्षकांच्या पाठिंब्यामुळेच हा प्रवास शक्य झाला. प्रेक्षकांच्या प्रेमामुळे प्रत्येक भाग अधिक प्रभावी करण्याची प्रेरणा मिळत असल्याचे तिने सांगितले.

मालिकेत 'शिवाय'ची भूमिका साकारणाऱ्या फर्मान हैदर यांनीही प्रेक्षकांचे आभार मानले. 'जगद्धात्री' हा आपल्या कारकिर्दीतील संस्मरणीय प्रवासांपैकी एक असल्याचे त्यांनी नमूद केले. दरम्यान, आगामी भागांमध्ये जगद्धात्री आणि शिवाय एका ड्रग्स तस्करी प्रकरणाचा तपास करताना दिसणार आहेत. रुद्र या सूत्रधाराचा पर्दाफाश करण्यासाठी जगद्धात्रीला कठीण आव्हानांचा सामना करावा लागणार असून त्यामुळे मालिकेत पुढील भागांमध्ये अधिक थरार आणि अनपेक्षित वळणे पाहायला मिळणार आहेत.

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### गंगाखेड नगरपालिकेच्या प्रशासकीय काळात कर्मचाऱ्यांच्या बेकायदा नियुक्त्यांसह पाणी पुरवठा व घनकचरा व्यवस्थापनात लाखोंचा गैरप्रकार : ॲड. मिथीलेश केंद्रे यांचा आरोप

**गंगाखेड,/प्रतिनिधी :** गंगाखेड नगरपालिकेंतर्गत प्रशासकीय राजवटीत तत्कालीन प्रशासकांनी संगणमत करीत कर्मचाऱ्यांच्या बेकायदेशीरपणे नियुक्त्या केल्या. तसेच पाणी पुरवठा व घनकचरा व्यवस्थापनातही मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार केले असल्याचा गंभीर आरोप राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे गटनेते ॲड. मिथिलेश केंद्रे यांनी केला.

ॲड. केंद्रे यांनी आयोजित केलेल्या पत्रकारपरिषदेत प्रशासकीय काळातील कथित गैरव्यवहार, नोकरभरती व आर्थिक अनियमिततांबाबत गंभीर आरोप करीत संबंधित कागदपत्रेही सादर केली. तत्कालीन प्रशासक तथा उपविभागीय अधिकारी जिवराज डापकर, तत्कालीन मुख्याधिकारी जयवंत सोनवने यांनी संगनमत करीत नियमबाह्य पध्दतीने कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या केल्या. लाड-पागे समितीच्या नियमानुसार स्थानिक स्वराज्यसंस्थांना केवळ स्वच्छता कर्मचारी नियुक्त करण्याचे अधिकार असतांना इतर पदांवरसुध्दा नियुक्त्या करण्यात आल्या. पाणी पुरवठा योजनेंतर्गत जलशुध्दीकरण केंद्रासह अन्य योजनांवर कामाविना ९० लाख रुपयांचा खर्च दाखविण्यात आला आहे. परंतु, प्रत्यक्षात कामेच झाली नाहीत, असाही आरोप ॲड. केंद्रे यांनी केला.

मागील तीन वर्षात घनकचरा व्यवस्थापनाच्या निविदा प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्या आहेत, असे नमूद करीत ॲड. केंद्रे यांनी गंगाखेड नगरपालिकेच्या नवीन होणाऱ्या इमारतीच्या बाजूची सार्वजनिक जागा मातोश्री दगडुबाई गुट्टे प्रतिष्ठानला देण्यात आल्याचा आरोपही केला.

दरम्यान, प्रशासकीय काळातील या वादग्रस्त निर्णयांची व नियमबाह्य कामांची सखोल चौकशी केली जावी व संबंधितांविरोधात गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी ॲड. केंद्रे यांनी केली. यावेळी नगरसेवक सुनील चौधरी, चंद्रकांत खंदारे, प्रविण घोबाळे, प्रमोद मस्के, विकास मुंडे, रणवीरराजे भालेराव, सुरेश साळवे आदी उपस्थित होते.

### पूर्णा तालुक्यात वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने फळबागांना तडाखा

**परभणी,/प्रतिनिधी :** पूर्णा तालुक्यातील एरंडेश्वर, कात्नेश्वर यासह अन्य गावांच्या शिवारास शनिवारी सायंकाळी वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने मोठा तडाखा दिला. त्यात या शिवारातील केळीच्या बागासह अन्य फळबागांचे अतोनात असे नुकसान झाले.

सायंकाळी ४ वाजेच्या सुमारास जोरदार वारे वाहू लागल्याबरोबर वातावरण पूर्णतः बदलले अन् या सोसाट्याच्या वाऱ्याने शेताशेतातील आखाड्यावरील पत्रे काही ठिकाणी उडाली. तर पूर्णा ते झिरोफाटा या रस्त्यावर ठिकठिकाणी झाडे कोसळली. त्यामुळे या रस्त्यावरील वाहतूक ठप्प झाली. वादळी वारे आणि पावसाने या भागातील केळींच्या बागांना मोठा तडाखा बसला. जवळपास ५० एक्कर जमीनीवरील केळीच्या बागा मोडून पडलेल्या अवस्थेत दिसून आल्या. त्यापेक्षाही जास्त या भागात अवकाळीने नुकसान झाले असावे, असा अंदाज आहे.

दरम्यान, या आपत्तीने काही शेतकऱ्यांचे कृषि पंपांचे सोलार पॅनल मोडून पडले. तर ठिकठिकाणी सोलारचेही मोठे नुकसान झाले.

### किमान १५ जूनपर्यंत राज्यात सर्वत्र मान्सूनच्या पावसाची शक्यता कमी

मान्सून कोकणात दाखल झाला, पण सर्वदूर सक्रिय नाही; शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये

**परभणी,/प्रतिनिधी:** मान्सून दक्षिण कोकणात दाखल झाला असून सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यांतील काही भागांमध्ये ९ जूनपर्यंत मध्यम ते जोरदार पावसाचा अंदाज आहे. मात्र त्यानंतर किमान १५ जूनपर्यंत राज्यातील पावसाचा एकंदरीत जोर तसेच मान्सूनच्या प्रगतीचा वेग कमी होण्याची शक्यता हवामानाच्या सध्याच्या अंदाजातून दिसून येत आहे. त्यामुळे या कालावधीत राज्यात सर्वत्र समाधानकारक पावसाची शक्यता कमी आहे.

सध्याच्या हवामान अंदाजानुसार किमान १५ जूनपर्यंत विदर्भ, मराठवाडा, खानदेश, आणि मध्य महाराष्ट्रातील काही भागांमध्ये दुपारनंतर ढग आणि विखुरलेल्या स्वरूपाचा मेघगर्जनेसह वादळी पाऊस पडण्याची शक्यता आहे. तथापि, हा पाऊस व्यापक क्षेत्रात पेरणीस पोषक ठरेल, अशी परिस्थिती अद्याप दिसत नाही.

### जिल्हाधिकारी सायकलवरून आले कार्यालयात दिला पर्यावरण संवर्धन व इंधन बचतीचा संदेश

**परभणी,/प्रतिनिधी :** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी आज स्वतः सायकलवरून कार्यालयात येत पर्यावरण संवर्धनाचा प्रेरणादायी आदर्श घालून दिला. त्यांच्या या उपक्रमामुळे पर्यावरण संरक्षण, प्रदूषण नियंत्रण आणि इंधन बचतीचा प्रभावी संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचला.

वाढते प्रदूषण, इंधनाचा वाढता वापर आणि बदलते हवामान या पार्श्वभूमीवर नागरिकांनी पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारण्याची गरज असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. शक्य तिथे सायकलचा वापर केल्यास इंधन बचतीसोबतच आरोग्य संवर्धनालाही मोठा फायदा होतो, असेही त्यांनी नमूद केले. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण, प्लास्टिकमुक्ती, स्वच्छता आणि नैसर्गिक संसाधनांच्या जतनासाठी प्रत्येकाने सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहनही जिल्हाधिकारी चव्हाण यांनी केले. जिल्हाधिकाऱ्यांच्या या अनोख्या उपक्रमाचे नागरिकांकडून स्वागत करण्यात आले.

### परभणी जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह पावसाचा इशारा

**परभणी,/प्रतिनिधी :** प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांनी दिलेल्या अंदाजानुसार परभणी जिल्ह्यात शनिवारी (दि. ६) सायंकाळी तुरळक ठिकाणी वादळीवारा, मेघगर्जना, विजांचा कडकडाट तसेच ३० ते ४० किलोमीटर वेगाने वारे वाहून हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

सध्या ग्रामीण भागात खरीप हंगामपूर्व कामांची लगबग सुरू असून शेतकरी अनेक कामात व्यस्त आहे. मान्सूनपूर्व पावसाचा अंदाज लक्षात घेता शेतकरी, नागरिक आणि पशुपालकांनी सावधान राहण्याचा इशारा देण्यात आला आहे.

### परभणीत वाढला उकाडा

**परभणी,/प्रतिनिधी :** शहरात रविवार दि.०७ जून रोजी मोठया प्रमाणात दुपारच्या सुमारास ऊन पडले होते.त्यामुळे शहरात चांगलीच गरमी होत होती.अखेर या गरमीमुळे नागरिकांच्या अंगाची लाहीलाही होत होती.

# कोकपिंपरी फाट्याजवळ एसटी व दुचाकीचा भीषण अपघात; आजी, आजोबा व नातवाचा मृत्यू

## दुचाकीला एसटीची जोरदार धडक; शेवळीतील एकाच कुटुंबावर दुःखाचा डोंगर

**परभणी ,/प्रतिनिधी:-** तालुक्यातील कोकपिंपरी फाट्याजवळ शनिवारी (दि. ६ जून) सायंकाळी सुमारे ५ वाजण्याच्या दरम्यान एसटी बस व दुचाकी यांच्यात झालेल्या भीषण अपघातात शेवडी (ता. जिंतूर) येथील एकाच कुटुंबातील तिघांचा जागीच मृत्यू झाला. या दुर्घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून मृतांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, भगवान बळीराम काळे (रा. शेवळी, ता. जिंतूर), सुशिलाबाई भगवान काळे (रा. शेवडी, ता. जिंतूर) आणि शिवम काळे (रा. शेवडी, ता. जिंतूर) हे कवडगाव येथे पाहुण्यांच्या धोंड्याच्या कार्यक्रमाला जाऊन दुचाकी (एमएच-३८-के-६६ ८२ वरून परतत होते. दरम्यान, कोकपिंपरी फाट्याजवळ जिंतूरहून परभणीकडे जात असलेल्या छत्रपती संभाजीनगरपरभणी एसटी बसची त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक बसली. अपघात इतका भीषण होता की भगवान काळे, सुशिलाबाई काळे आणि शिवम काळे या तिघांचाही जागीच मृत्यू झाला. धडकेनंतर भगवान काळे हे दुचाकीसह एसटी बसखाली




अडकले होते. घटनेनंतर परिसरात मोठी गर्दी जमली होती. अपघातानंतर एसटी बस चालक घटनास्थळावरून निघून थेट बोरी पोलीस ठाण्यात हजर झाल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी चालकाची चौकशी सुरू केली असून अपघाताचे नेमके कारण शोधण्याचे काम सुरू आहे. घटनेची माहिती मिळताच बोरी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रामेश्वर धोंडगे, पीएसआय एस. एम. थोरवे, बीट जमादार शेख वसीम, विशाल लाड, राजेश जटाळ सुनील घुगे यांच्यासह पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून कोकचे सरपंच वहीद पठाण, पोलीस पाटील संदीप झाडे, आशरफ पठाण तसेच ग्रामस्थांच्या मदतीने मृतदेह रुग्णवाहिकेद्वारे ग्रामीण रुग्णालय, बोरी येथे पाठविले. तिन्ही मृतदेहांवर शवविच्छेदनाची प्रक्रिया सुरू असून अपघाताची नोंद करण्याचे कामही सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. घटनेची माहिती मिळाल्यानंतर उपविभागीय पोलीस अधिकारी (डीवायएसपी)दीपक कुमार वाघमारे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. दरम्यान, जिंतूरपरभणी मार्गावरील कोकपिंपरी फाटा हा अपघातप्रवण ठिकाण म्हणून ओळखला जात असून येथे गतिरोधक व इतर सुरक्षा उपायांचा अभाव असल्याने वारंवार अपघात घडत असल्याची नागरिकांची तक्रार आहे. या मार्गावर तातडीने सुरक्षा उपाययोजना राबवून अपघातांना आळा घालावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे

## ६० बेडचे रुग्णालय लवकर सुरू करा- मनपा आयुक्त

**परभणी ,/प्रतिनिधी-** महानगरपालिकेचे आयुक्त नितीन नार्वेकर यांनी शनिवारी शहरातील विविध आरोग्य सुविधांची पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. यामध्ये कल्याण मंडपम, मनपा आरोग्य केंद्र जायकवाडी वसाहत तसेच नवीन युसीएचसी ६० बेड रुग्णालयाचा समावेश होता.

आयुक्त नार्वेकर यांनी संबंधित ठिकाणी भेट देऊन सुरू असलेल्या कामांचा आढावा घेतला. यावेळी उपायुक्त तुकाराम कदम, आरोग्य अधिकारी डॉ. कल्पना सावंत, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. नितीन पितळे, सहाय्यक आयुक्त गजानन जाधव, मालमत्ता व्यवस्थापक भगवान यादव, निलेश जोगदंड तसेच संबंधित कर्मचारी उपस्थित होते.

नागरिकांच्या आरोग्य सुविधांच्या दृष्टीने ६० बेडचे रुग्णालय शक्य तितक्या लवकर सुरू करण्यासाठी आवश्यक प्रक्रिया गतीने पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी आरोग्य विभागाला दिले. पाहणीदरम्यान त्यांनी विभाग प्रमुख, सहाय्यक आयुक्त आणि उपायुक्त यांच्याशी चर्चा करून आरोग्य सेवा अधिक सक्षम व परिणामकारक करण्याबाबत मार्गदर्शन केले.

## गतिरोधकांच्या मागणीसाठी १० जूनपासून बेमुदत ठिय्या आंदोलनाचा दिला इशारा

**सेलू ,/प्रतिनिधी-** शहरातील रायगड कॉर्नर ते नायरा पंप (परभणी रोड) तसेच छत्रपती शिवाजी महाराज स्मारक ते वालूर नाका मदरसा या मार्गांवर तातडीने गतिरोधक बसविण्यात यावेत, अन्यथा १० जून पासून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयासमोर बेमुदत ठिय्या आंदोलन करण्यात येईल, असा इशारा श्री वेंकटेश्वर प्रतिष्ठान व स्थानिक नागरिकांच्या वतीने देण्यात आला आहे.

या संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाला देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, संबंधित मार्गांवर शाळा, महाविद्यालये तसेच दाट नागरी वस्ती असून मोठ्या प्रमाणात विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि सर्वसामान्य नागरिकांची वर्दळ असते. मात्र, या रस्त्यांवर भरधाव वेगाने धावणाऱ्या वाहनांमुळे अपघाताचा धोका निर्माण झाला असून नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

नागरिकांनी यापूर्वी अनेकदा सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तोंडी व लेखी स्वरूपात मागणी केली होती. तसेच विभागाच्या कार्यालयासमोर ठिय्या आंदोलनही करण्यात आले होते. त्यानंतर ५ मे २०२६ रोजी आठ दिवसांत गतिरोधक बसविण्याचे लेखी आश्वासन देण्यात आले होते. मात्र, एक महिन्याचा कालावधी उलटूनही अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

या निषेधार्थ १० जूनपासून शालेय विद्यार्थी, पालक व नागरिकांच्या सहभागातून सार्वजनिक बांधकाम कार्यालय, सेलू येथे बेमुदत ठिय्या आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. गतिरोधक बसविण्याबाबत ठोस निर्णय होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

यावेळी जयसिंग शेळके, डॉ. आलेश बुरेवार, संतोष निर्वळ, रवनितसिंग बब्बर, कृष्णा बहीवाल, अक्षय जोशी, ज्ञानेश्वर तमखाने, पवन नाईक, अशोक अंभूरे, मुंजा गाडेकर, शाहरुख पठाण, गौरव चव्हाण, पंकज परदेशी यांच्यासह परिसरातील नागरिक उपस्थित होते.

## जिंतूर तालुक्यातील नागनगाव येथे वादळी पावसाचा तडाखा; सौर पंपांच्या प्लेट्सचे मोठे नुकसान, शेतकऱ्यांवर मोठे संकट!

**जिंतूर ,/प्रतिनिधी-** तालुक्यात ३१मे शनीवारी रात्री झालेल्या अचानक आणि तीव्र वादळी वाऱ्यासह पावसाने शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान केले आहे. विशेषतः लिबाळा येथील शेतकरी वैजनाथ सखाराम दराडे याचे शेतनागनगाव शिवारात आसुन त्याचा गट नंबर २९ आहे शेतकऱ्यांवर दुहेरी संकट ओढवले असून, त्यांच्या शेतात लावलेल्या सौर ऊर्जा पंपांच्या प्लेट्सचे अतोनात नुकसान झाले आहे. येथील शेतकरी सौर प्लेट्स वादळी वाऱ्याच्या प्रचंड वेगाने तुटून खाली पडल्या आहेत आणि संपूर्ण सेट निकामी झाला आहे.

ऐन उन्हाळ्याच्या शेवटी शेवटी जेव्हा पीक वाचवण्यासाठी पाण्याची अत्यंत गरज असते, तेव्हाच हे अस्मानी संकट ओढवल्याने शेतकरी वर्ग हवालदिल झाला आहे. सौर ऊर्जा पंपांवर अवलंबून असलेली सिंचन व्यवस्था



ठप्प झाली आहे. नागनगाव येथील शेतकरी यांच्यासह अनेक शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. या संदर्भात प्रतिक्रिया देताना, नुकसानग्रस्त शेतकरी म्हणाले की, ''आम्ही मोठ्या आशेने सौर पंप लावले होते, जेणेकरून विजेच्या समस्येतून सुटका मिळेल. मात्र, ३१मे एकाच पावसाने आणि वादळाने आमचे स्वप्न धुळीस मिळवले आहे. आता सौर प्लेट्सची दुरुस्ती कशी करावी, हा मोठा प्रश्न आहे. यासाठी प्रचंड खर्च येणार असून, आमची आर्थिक स्थिती ती पेलण्याइतकी नाही.''

प्रशासनाकडे मागणी: या परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी आणि गावकऱ्यांनी प्रशासनाकडे त्वरित दखल घेण्याची मागणी केली आहे.

शासनाने संबंधित सौर ऊर्जा पुरवठादार कंपनीला (ज्या कंपनीने हे सेट लावले आहेत) तातडीने सूचना द्याव्यात. संबंधित कंपनीने या नुकसानग्रस्त सौर ऊर्जा सेटची युद्धपातळीवर दुरुस्ती करून द्यावी, जेणेकरून शेतकऱ्यांच्या पिकांचे संरक्षण होऊ शकेल.

तसेच, सरकारने देखील त्वरित पिकांच्या आणि सौर पंपांच्या नुकसानीचे पंचनामे करावेत आणि शेतकऱ्यांना तात्काळ मदत जाहीर करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

## येलदरकर कॉलनीतील पुरातन विहीरीच्या पुनर्जीवनाच्या कामास प्रारंभ

**परभणी ,/प्रतिनिधी-** येथील वसमत रस्त्यावरील येलदरकर कॉलनीतील पुरातन विहिरीचा गाठ काढून त्याचे पुनर्जीवन करण्याच्या कामास शनिवारी प्रारंभ झाला.

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून जलमित्र संघटना, येलदरकर कॉलनीतील रहिवाशी व महापालिका सदस्यांनी विहिर पुनर्जीवनाचा संकल्प सोडला त्याप्रमाणे माजीमंत्री सुरेश वरपुडकर, महापौर सय्यद इकबाल, माजी महापौर तथा विद्यमान नगरसेविका सौ. मीना वरपुडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवारी या पुरातन विहिरीचा गाठ काढण्याच्या कामांना सुरुवात झाली. यावेळी नगरसेविका सौ. गिरीजा आजेगांवकर, गणेश टाक, रितेश झांबड यांच्यासह भाजपाचे महानगर जिल्हाध्यक्ष शिवाजी भरोसे, नगरसेवक केदार खटींग, जलमित्र संघटनेचे बाळासाहेब देशमुख, सुभाष जावळे, त्रिंबकराव कदम, विलास कौसडीकर, डॉ. सुहास विभुते, उपेंद्र दुधगांवकर, लक्ष्मीकांत पिंपळगांवकर, सौ. क्रांती हमदापुरकर आदी उपस्थित होते.

जलमित्र संघटनेचे अध्यक्ष शंकर आजेगांवकर यांनी प्रास्ताविकातून या संदर्भातील संकल्पना स्पष्ट केली तर माजी मंत्री वरपुडकर यांनी या कामात कॉलनीतील रहिवाशांना सक्रिय सहभाग नोंदवावा व वृक्ष संवर्धनासाठीही पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली.

## मान्सून आपत्ती व्यवस्थापनासाठी महापालिका सज्ज; २४ तास नियंत्रण कक्ष सुरू शोध-बचाव पथकांची नियुक्ती; ९० कर्मचाऱ्यांवर जबाबदारी

**परभणी ,/प्रतिनिधी:** पावसाळी हंगामात उद्भवणाऱ्या नैसर्गिक आपत्ती व आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी परभणी महानगरपालिकेने व्यापक तयारी सुरू केली असून, प्रभाग समिती अ, ब आणि क अंतर्गत आपत्ती व्यवस्थापन व शोध-बचाव पथकांच्या नियुक्तीचे आदेश आयुक्त नितीन नार्वेकर यांनी दिले आहेत. तसेच २४ तास कार्यरत राहणारा आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्ष सुरू करण्यात आला आहे.

महानगरपालिका क्षेत्रात उद्भवणाऱ्या आपत्कालीन परिस्थितीची माहिती संकलित करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या आपत्ती व्यवस्थापन कक्षाचा दूरध्वनी क्रमांक (०२४५२) २२१३७५ असून टोल फ्री क्रमांक १८००२३३१३६८ आहे. नागरिकांनी आपत्तीच्या प्रसंगी या क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सन २०२६-२७ च्या मान्सून कालावधीसाठी नियंत्रण कक्षात तीन शिफ्टमध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सकाळी ६ ते दुपारी २, दुपारी २ ते रात्री १० आणि रात्री १० ते सकाळी ६ अशा शिफ्टमध्ये प्रभाग समिती अ, ब आणि क अंतर्गत ४८ कर्मचारी २४ तास सेवेत उपलब्ध राहणार आहेत.

आपत्कालीन परिस्थितीत प्राप्त होणाऱ्या सर्व संदेशांची तत्काळ नोंद करून महत्त्वाची माहिती अग्निशमन विभागाला कळविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय, विभागीय कार्यालय छत्रपती संभाजीनगर, जिल्हा सामान्य रुग्णालय आणि इतर यंत्रणांशी सातत्याने समन्वय ठेवण्यात येणार आहे.

दरम्यान, शहरात तीन ठिकाणी शोध व बचाव पथके स्थापन करण्यात आली असून त्यासाठी ४२ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. आपत्तीच्या काळात तातडीने घटनास्थळी पोहोचून मदतकार्य करण्याची जबाबदारी या पथकांवर सोपविण्यात आली आहे. सहाय्यक आयुक्तांना संबंधित प्रभागातील परिस्थितीवर लक्ष ठेवून त्वरित कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

पथकातील सदस्यांना पथक प्रमुखांच्या परवानगीशिवाय मुख्यालय सोडता येणार नसून, अत्यावश्यक सेवा अधिनियमातील तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहणार आहे. कर्तव्यात हलगर्जीपणा किंवा बेजबाबदारपणा आढळल्यास संबंधितांवर तात्काळ कारवाई करण्यात येईल, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

सर्व अधिकारी, कर्मचारी आणि विभाग प्रमुखांनी आपले भ्रमणध्वनी २४ तास सुरू ठेवावेत तसेच नियंत्रण कक्षातील शिफ्टनिहाय जबाबदारी काटेकोरपणे पार पाडावी, असे आवाहन आयुक्त नितीन नार्वेकर यांनी केले आहे.

# एथिकल हॅकिंगची अद्भुत दुनिया

## विशेष

कर्नल अभय पटवर्धन (निवृत्त)

सीबीएसईच्या २०२६ मध्ये झालेल्या १२ वीच्या परीक्षा निकालानंतर असंख्य असंतुष्ट विद्यार्थ्यांनी उत्तरपत्रिकांचे पुनर्मूल्यांकन करवले. मूळ आणि पुनर्मूल्यांकनातील तफावतीमुळे स्टँडर्ड ऑन स्क्रीन मार्किंग पोर्टल (ओएसएम) प्रक्रियेतील त्रुटी उजागर झाल्यात. २०२६ चा निकाल २०२५ मधील निकालापेक्षा ३.१० टक्क्यांनी कमी झाला. ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी झाली आणि विद्यार्थ्यांना मिळालेले गुण त्यांच्या अपेक्षेनुसार नसल्यामुळे ओएसएम प्रणालीवर प्रश्नचिन्ह उभे झाले. देशभरातील विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड मोठा असंतोष निर्माण होऊन देशात सर्व दूर मोठ्या प्रमाणात निदर्शने सुरू झालीत आणि अजूनही होताहेत. ही परीक्षा झाल्यानंतर भारतातीलच निसर्ग अधिकारी आणि सार्थक सिद्धांत या दोन तरुण नैतिक तांत्रिक तज्ज्ञ (एथिकल हॅकर्स) विद्यार्थ्यांनीच सीबीएसईच्या ओएसएम पोर्टलमधील त्रुटींचा पर्दाफाश केला.

आजमितीला डिजिटल युगातील सतत बदलत्या संगणकीय धोक्यांच्या (सायबर थ्रेट्स) वातावरणात, संवेदनशील विदा रक्षणासाठी (सेन्सेटिव्ह डेटा प्रोटेक्शन) एथिकल हॅकर्सच तांत्रिक कौशल्य आणि नैतिक मूल्यांचं महत्त्व निर्विवाद आहे. एथिकल हॅकिंग ऊर्फ पेनिट्रेशन टेस्टिंग ऊर्फ व्हाईट हॅट हॅकिंगमध्ये संगणक प्रणाली, अनुप्रयोग/ॲप, संगणक सॉफ्टवेअर किंवा विदेत (डेटा) अनधिकृत प्रवेश मिळविणे, त्यातील त्रुटींचा आढावा घेणे आणि सुरक्षेच्या उपाययोजना केल्या जातात. एथिकल हॅकर्स संगणकीय सुरक्षिततेला भेदण्यासाठी सायबर गुन्हेगारांची पद्धत आणि साधनांचा वापर करतात. एथिकल हॅकिंग सर्वमान्य असून अपरिहार्य आहे. कारण हे हॅकर्स अ) विदा चोरी रोखण्यासाठी, संगणकीय गुन्हेगारांनी विदा पद्धतीला भेदून चोरण्याआधीच संस्थेला प्रतिबंधात्मक उपाययोजना अंगीकारण्यास मदत करतात. ब) संस्थेच्या विद्यमान सुरक्षा उपायांच्या परिणामकारकतेबद्दल मौल्यवान अंतर्दृष्टी प्रदान करीत असल्यामुळे संस्थांना नवीनतम/अद्ययावत, संगणकीय संरक्षण प्रोटोकॉल्स अंगीकारता येतात आणि क) एथिकल हॅकिंगचा वापर करणाऱ्या संस्थांनी अंगीकारलेल्या सायबर सुरक्षा प्रणालीमुळे ग्राहक, भागीदार आणि हितधारकांची विश्वास वृद्धी होते.

सूत्रांनुसार निसर्ग अधिकारीने सीबीएसई ट्वेल्थ स्टँडर्ड ओएसएममधील त्रुटी आणि सार्थक सिद्धांतने कोएम्प्ट एज्यु टेक या संस्थेलाच कॉन्ट्रॅक्ट देण्यासाठी सीबीएसईने केलेल्या ढळढळीत नियम फेरबदलांना उजागर केले आहे. या दोन्ही बाबींमुळे लाखो विद्यार्थ्यांना तांत्रिक आणि प्रक्रियात्मक त्रुटींचा सामना करावा लागला आणि डिजिटल सुधारणांमुळे परीक्षेची/परीक्षेतील सचोटी, निःपक्षता आणि विद्यार्थ्यांच्या व्यक्तिगत माहिती सुरक्षेचे धिंडवडे निघाले. सीबीएसईने याच वर्षी अंगीकारलेले ओएसएम पोर्टल, परीक्षकांसाठी एक नवीन डिजिटल प्रणाली होती/आहे. मे २०२६ च्या चौथ्या आठवड्यात निसर्ग अधिकारीने पोर्टल कोड हॅक करून त्यातील त्रुटी उजागर केल्यात. ओएसएममुळे परीक्षकांना ऑनलाईन पोर्टलवर लॉग-इन करून उत्तरपत्रिकांच्या स्कॅन्ड प्रतींचे मूल्यांकन करता येते. हा बदल प्रामुख्याने लांबलचक मूल्यांकन प्रक्रियेला सुव्यवस्थित करण्यासाठी करण्यात आला. दुसरीकडे ऑनस्क्रीन मार्किंग प्रणाली तयार करून ती होस्ट करण्यासाठी सीबीएसईने हैदराबादच्या कोएम्प्ट एज्यु टेकला या नवीन पद्धतीसाठी आवश्यक असणाऱ्या पायाभूत सुविधा तयार करून राबविण्याची जबाबदारी दिली होती. कोएम्प्ट एज्यु टेकलाच ही जबाबदारी देण्यासाठी सीबीएसईने आपल्या नियमांत कोणते बदल कसे केलेत हे सार्थक सिद्धांतने दाखवून दिले.

या किस्स्याचा ओनामा वेदांत श्रीवास्तवने केला. त्याने १० वी सीबीएसई भौतिकशास्त्राच्या उत्तरपत्रिकेची छायाप्रत मिळविण्यासाठी अर्ज केला होता. ती मिळाल्यावर त्याच्या लक्षात आले की, सीबीएसईने अपलोड केलेली भौतिकशास्त्राची उत्तरपत्रिका त्याची नव्हती. दुर्दैवाने हा अपवाद नव्हता. अनेक विद्यार्थ्यांना असेच अनुभव आलेत. त्यामुळे निसर्ग आणि सिद्धांतने हे प्रकरण स्वतःच हाताळण्याचा निर्णय घेतला असावा, असे म्हटल्यास ते वावगे होणार नाही.

निसर्ग अधिकारी हा २०२६ सीबीएसई १२ परीक्षेला बसलेला विद्यार्थी, सायबर सुरक्षा संशोधकही आहे. २०२६ फेब्रुवारीमध्ये त्याने संगणकावर सहज फिरता फिरता मनोरंजनास्तव सीबीएसई ओएसएम प्लॅटफॉर्म हॅक केला आणि भारतीय संगणक आपत्कालीन प्रतिसाद टीमला (इंडियन कॉम्प्युटर इमरान रिस्पॉन्स टीम: सर्ट इन) त्याची माहिती दिली. हॅकिंगमध्ये मिळालेल्या माहितीच्या विश्लेषणांनतर त्याच्या समोर ओएसएम सॉफ्टवेअरमधील अनेक कमतरता, दोष, उजागर झाले. निसर्ग अधिकारीने केवळ उत्सुकतेपोटी सीबीएसईच्या नवीन सुरू झालेल्या ओएसएम मूल्यांकन प्लॅटफॉर्मच्या बॅकएंड कोडची तपासणी केली असता त्याला केवळ ३० मिनिटांत त्या पोर्टलमधील गंभीर सुरक्षा त्रुटी मिळाल्या.



अ) सर्वांत गंभीर त्रुटी म्हणजे फ्रंट एंड सोर्स कोडमध्ये थेट एम्बेड केलेल्या हार्ड कोडेड मास्टर पासवर्डमुळे परीक्षकाचा युजर आयडी असलेल्या कोणाही अनधिकृत व्यक्तीला वन टाईम पासवर्ड, ओटीपी पडताळणी टाळून पोर्टलमध्ये प्रवेश मिळविणे शक्य होत होते.

ब) पोर्टलमध्ये शिरल्यावर ती अनधिकृत व्यक्ती कोणत्याही खऱ्या शिक्षकाच्या नावाने लॉग-इनद्वारे मूल्यमापनकर्त्यांच्या डॅश बोर्डमध्ये प्रवेश करून कोणत्याही विद्यार्थ्यांचे गुण बदलू शकते.

क) बोर्डाची ॲमेझॉन वेब सर्व्हिसेस स्टोरेज बकेट संपूर्ण चुकीच्या पद्धतीने कॉन्फिगर केलेली असल्यामुळे अनधिकृत वापरकर्त्यांना १८ लाखांहून अधिक स्कॅन केलेल्या विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका आणि प्रश्नपत्रिका सहजपणे ॲक्सेस करून डाऊनलोड करता येणार होत्या.

ड) पोर्टलमध्ये कार्यक्षम पासवर्ड रीसेट पडताळणीची सोय नव्हती. एखादा अनधिकृत/अप्रमाणित वापरकर्ता केवळ स्वतःच्या युजर आयडीचा वापर करून दुसऱ्याच्या खात्याचा पासवर्ड बदलू शकत होता, ज्यामुळे जुन्या पासवर्डची पडताळणी पूर्णपणे टाळली जात होती. सीबीएसई १२ वी परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर निसर्ग अधिकारीने सोशल मीडियावर ही बाब सार्वजनिक केली.

त्याच्या हे लक्षात आले की, सर्वप्रथम संगणक हल्लेखोर, लक्ष्यित व्यक्तीचा सार्वजनिक असलेला युजर आयडी आणि स्कूल कोड डाऊनलोड करेल. त्यानंतर कोड स्क्रिप्टमधील हार्डकोडेड मास्टर पासवर्ड मिळवून तो पोर्टलमध्ये एक परीक्षक म्हणून लॉग-इन करू शकेल. हा पासवर्ड शोधताना अधिकारीला पासवर्ड संरक्षण व्यवस्थेला तोंडच द्यावे लागले नाही. कारण ती अस्तित्वातच नव्हती. जर निसर्ग अधिकारीसारखा तरुण मुक्तछंदी हे सहजपणे करू शकला तर व्यावसायिक संगणक हल्लेखोराला कुठल्याही विद्यार्थ्याच्या उत्तरपत्रिकेत किंवा मार्क लिस्टमध्ये मुक्तपणे बदल करण सहज शक्य होईल. निसर्गने ही सर्व माहिती लगेच सर्ट-इनला दिली. उत्तरात त्याला 'याची तपासणी केली जाईल' हा प्रतिसाद मिळाला. मात्र, वेदांत श्रीवास्तवची कहाणी कळल्यानंतर निसर्ग अधिकारीने त्याच्या हॅकिंग आणि सीबीएसईच्या उत्तराची ब्लॉग पोस्ट प्रकाशित केली आणि वातावरण तापणे सुरू झाले.

दुसरीकडे सार्थक सिद्धांतने ओएसएम पोर्टलमधील डिजिटल पायाभूत सुविधा तयारीच्या व्यावसायिक आणि कायदेशीर बाजूंचा अभ्यास करून सोशल मीडियावर, सीबीएसईच्या रिक्वेस्ट फॉर प्रपोजल/आरएफपी निविदा दस्तावेजांचे (टेंडर सिस्टिम) सार्वजनिक विश्लेषण प्रकाशित केले. वेदांत श्रीवास्तवची कहाणी कळल्यानंतर सार्थक सिद्धांतनेदेखील या शोधाची ब्लॉग पोस्ट टाकली आणि त्यात; अ) सीबीएसई ही एक सार्वजनिक संस्था असल्यामुळे ओएसएम व्यवस्थापनासाठी स्वतःच्या पसंतीच्या खाजगी विक्रेत्याची निवड न करता सार्वजनिक प्रस्ताव विनंती/आरएफपी जारी करून स्पर्धात्मक निविदा मागवायला पाहिजे होत्या. ब) संचालक मंडळाने कंपनीच्या इतिहासाशी संबंधित कलम काढून टाकले. क) संचालक मंडळाने कॅपॅबिलिटी मॅच्युरिटी मॉडेल इंटिग्रेशन स्तर ५ वरून ३ पर्यंत खाली आणल्यामुळे सॉफ्टवेअर इंजिनीअरिंगची गुणवत्ता वांध्यात येऊन विद्यार्थ्यांची संवेदनशील माहिती खुली झाली आणि स्कॅनरच्या गुणवत्तेतही घट केल्याचे स्पष्ट केले. सार्थक सिद्धांतनुसार हा केवळ एक योगायोग नाही. या ब्लॉगनंतर सोशल मीडियावर स्फोट होणे स्वाभाविक होते. दोन्ही ब्लॉगच्या उत्तरादाखल 'आम्ही सायबर सुरक्षा व्यावसायिकांची एक टीम तैनात केली असून ती ओएसएम पोर्टलमधील त्रुटींची तपासणी करेल. यासाठी सूचना द्यायच्या असल्यास नागरिकांनी संपर्क साधावा' असे आवाहन सीबीएसई संचालक मंडळाने केले आहे.

संगणकीय हॅकिंग, अनधिकृत घुसखोरी, चोरीमुळे सामान्यतः उत्पादक हेतूंसाठी वैयक्तिक आणि गोपनीय माहिती उघड करता येते. संगणकात नैतिक घुसखोरी (एथिकल हॅकिंग) करणारी व्यक्ती किंवा संस्था, नेटवर्क किंवा सिस्टिमच्या माध्यमातून चाचणी करून, नेटवर्कमधील त्रुटी शोधून त्यात दुरुस्ती करण्यासाठी एखाद्या उपकरणात (सिस्टिम किंवा नेटवर्क) प्रवेश करू शकते. बहुतेक नैतिक हॅकर्स, विविध दृष्टिकोन, कार्यपद्धती आणि साधनांच्या वापराद्वारे सिस्टिमची चाचणी करून सायबर हल्ल्यांपासून आपल्या गोपनीयतेचे रक्षण करतात. असे करताना त्यांना सायबर सुरक्षा कायदे आणि नियमांचे पालन करून, संगणक गुन्हे कायदे, विदा संरक्षण नियम आणि बौद्धिक संपदा हक्क यांसारख्या कायदेशीर चौकटींशी परिचित व्हावे लागते. वाढत्या इंटरनेट वापरामुळे सांप्रत काळात संगणकीय गोपनीयता सुनिश्चित करण्याची प्रचंड गरज निर्माण झाली आहे. वापरकर्ते आणि उद्योगांच्या नेटवर्कची विश्वसनीयता आणि सुलभता अत्यंत महत्त्वाची बनल्यामुळे वापरकर्त्यांची ओळख व गोपनीय माहितीच्या रक्षणासाठी सुरक्षित पायाभूत सुविधांचा विकास अत्यावश्यक झाला आहे. इंटरनेटचा विकास आणि लोकप्रियतेमुळे हॅकिंग, फिशिंग, स्पॅमिंग करत सायबर घुसखोरी/चोरी करता येते. व्यक्ती आणि संस्थांनी आपला डेटा क्लाऊड आर्किटेक्चरवर स्थलांतरित केल्यामुळे डेटा संरक्षणाचे नवीन प्रश्न आणि धोके निर्माण झाले आहेत.

सीबीएसई आणि नीट परीक्षांमधील प्रचंड गोंधळानंतर दस्तुरखुद्द पंतप्रधानांनी यात लक्ष घालत संचालक मंडळाचे अध्यक्ष व सचिव तडकाफडकी बदललेत. मे २६ मध्येच उजागर झालेली नीट परीक्षेतील प्रश्नपत्रिका गळती आणि सीयूईटी परीक्षेतील तांत्रिक अडचणींच्या पृष्ठभूमीवर परीक्षांच्या सद्यस्थितीबद्दल देशात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

निसर्ग अधिकारी आणि सार्थक सिद्धांतने केलेली हॅकिंग सीबीएसईच्या ऑन स्क्रीन मार्किंग पोर्टलमध्ये उघड झालेल्या सायबर सुरक्षा त्रुटी आणि टेंडरच्या विसंगती शोधण्यासाठी झालेले दुर्भावनापूर्ण सायबर हल्ले नव्हते तर १२ वीच्या उत्तरपत्रिकांचे डिजिटल मूल्यांकन कसे होईल याबद्दल संगणकीय तंत्रज्ञान कुशल, किशोरवयीन मुलांनी केलेल्या तपासाचा हा एक भाग होता, असे माझे मत आहे. मात्र, सरकारने आता याची पुनरावृत्ती होणार नाही, याची ग्वाही लोकांना देणे अनिवार्य आहे. केवळ संबंधित अधिकाऱ्यांची बदली करून काहीही साध्य होणार नाही. नीट आणि सीबीएसई मिळून अंदाजे ४१ लाख विद्यार्थ्यांच्या आकांक्षांवर या गलथानपणामुळे पाणी फेरले गेले आहे. या विद्यार्थ्यांच्या मनात धुमसत असलेल्या असंतोषाचा फायदा कॉक्रोच जनता पार्टी, असंतुष्ट विरोधक आणि अर्बन नक्षल्यांनी घेतल्यास त्यात काहीच नवल नसेल. राजा, सावध हो, रात्र वैऱ्याची आहे...!

नागपूर/९४२२१४९८७६

## चिंतन

ॲड. शिवाजी कराळे

# समन्वय साधणारे व्यापक धोरण हवे

**राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभागाच्या ताज्या अहवालानुसार गुन्हेगारी ही केवळ कायदा आणि सुव्यवस्थेची समस्या नसून सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि मानसिक आरोग्याशी जोडलेला प्रश्न आहे. त्यासाठी कठोर शिक्षा किंवा पोलिसांची संख्या वाढवण्याबरोबरच मूल्यसंस्कार, रोजगारनिर्मिती, महिलांसाठी सुरक्षित वातावरण, मानसिक आरोग्य सेवा आणि तंत्रज्ञानाधारित पोलिसिंगचा समन्वय साधणारे व्यापक शैक्षणिक धोरण आवश्यक आहे.**

नवीन भारतीय न्याय संहिता (बीएनएस) लागू झाल्यानंतर काही गुन्हे संज्ञेय गुन्ह्यांच्या यादीतून वगळल्यामुळे काही अपराधांची आकडेवारी कमी झालेली दिसते; परंतु केवळ कागदोपत्री घट झाली म्हणून वास्तव बदलले, असे मानणे धोकादायक ठरेल. गुन्ह्यांची नोंद कमी झाली म्हणजे गुन्हे कमी झाले, असा सरधोपट निष्कर्ष काढता येत नाही. अनेकदा भीती, सामाजिक दबाव किंवा प्रशासनावरील अविश्वासामुळे गुन्हे नोंदवलेही जात नाहीत. आज भारत एका महत्त्वाच्या वळणावर उभा आहे. एका बाजूला डिजिटल आणि आर्थिक महासत्ता होण्याची महत्त्वाकांक्षा आहे, तर दुसऱ्या बाजूला वाढती गुन्हेगारी, सामाजिक असुरक्षितता आणि मानसिक तणाव आहे. या दोन्ही चित्रांमधील दरी कमी करायची असेल, तर आकडेवारीकडे केवळ माहिती म्हणून नव्हे तर समाजाला दिशा देणारा इशारा म्हणून पाहावे लागेल. अन्यथा, विकासाच्या प्रकाशामागील अंधार गडद होत जाईल. भारत आज एका ऐतिहासिक वळणावर उभा आहे. एकीकडे जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था होण्यासाठी आपली घोडदौड सुरू आहे, तर दुसरीकडे आपण 'विश्वगुरू' म्हणून जगाला मार्गदर्शन करण्याची आकांक्षा बाळगत आहोत. अंतराळ मोहिमेतील यश, डिजिटल क्रांती आणि जागतिक मंचावर वाढलेला भारताचा दबदबा ही आपल्या प्रगतीची लक्षणे आहेत; मात्र या चकाकत्या चित्राच्या पाठीमागे गुन्हेगारीच्या वाढत्या आलेखाचे एक गडद सावट पसरलेले दिसते. आर्थिक महासत्ता होण्याच्या वाटेवर 'गुन्हेगारी' हा शाप ठरत आहे का, याचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आता आली आहे.

कोणत्याही देशाची प्रगती केवळ जीडीपीच्या आकड्यांवर मोजली जात नाही. त्या देशातील नागरिक किती सुरक्षित आहेत, यावर ती अवलंबून असते. भारताने उत्पादक क्षेत्र, पायाभूत सुविधा आणि तंत्रज्ञानात मोठी झेप घेतली आहे; मात्र समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत या समृद्धीचे फायदे पोहोचण्यापूर्वीच गुन्हेगारीची कीड अर्थव्यवस्थेला पोखरू लागली आहे. 'डिजिटल इंडिया'च्या युगात सायबर गुन्हे हे सर्वांत मोठे आव्हान बनले आहे. आर्थिक फसवणुकीमुळे सर्वसामान्यांचा बँकिंग व्यवस्थेवरचा विश्वास डळमळीत होत आहे. मोठ्या बँकिंग फसवणुकी आणि भ्रष्टाचारामुळे परकीय गुंतवणुकीवर परिणाम होतो. व्यवस्थेत पारदर्शकता कमी होते, तेव्हा गुंतवणूकदार पाठ फिरवतात. रिअल इस्टेट, रस्तेबांधणी आणि स्थानिक उद्योगांमध्ये आजही संघटित टोळ्यांचा हस्तक्षेप दिसून येतो, जो विकासाचा वेग मंदावतो. भारत स्वतःला 'विश्वगुरू' म्हणवून घेतो, तेव्हा त्याचा अर्थ केवळ लष्करी किंवा आर्थिक शक्ती असा नसून 'नैतिक शक्ती' असा असतो. प्राचीन काळी नालंदा आणि तक्षशिला ही ज्ञानाची केंद्रे होती. कारण तिथे चारित्र्यसंपन्न समाज घडत होता. आज आपण महिलांवरील अत्याचार, अल्पवयीन मुलांमधील वाढती गुन्हेगारी आणि अमली पदार्थांच्या विळख्यातील तरुणाई पाहतो, तेव्हा आपल्या नैतिक मूल्यांच्या ऱ्हासाची जाणीव होते. नागरिक सुरक्षित नसतात आणि न्यायव्यवस्था वेळखाऊ असते, त्या देशाकडे जागतिक स्तरावर केवळ 'बाजारपेठ' म्हणून पाहिले जाते, 'मार्गदर्शक' म्हणून नाही.

गुन्हेगारी वाढण्यामागे केवळ पोलिसांचे अपयश नसून सामाजिक आणि आर्थिक कारणेही आहेत. वाढती महागाई आणि हाताला काम नसलेल्या तरुणाईचे गुन्हेगारीकडे वळणे ही चिंतेची बाब आहे. श्रीमंत आणि गरीब यांच्यातील दरी गुन्हेगारीला खतपाणी घालते. न्यायाला होणारा विलंब हा न्याय नाकारण्यासारखाच आहे. वर्षानुवर्षे चालणारे खटले गुन्हेगारांचे मनोबल वाढवतात. 'एआय' आणि डीपफेकसारख्या तंत्रज्ञानाचा वापर करून सामाजिक सलोखा बिघडविण्याचे प्रयत्न होत आहेत. भारताला खऱ्या अर्थाने महासत्ता व्हायचे असेल, तर 'कठोर कायद्यांसोबतच प्रभावी अंमलबजावणी' या सूत्रावर काम करावे लागेल. केवळ मनुष्यबळ वाढवून चालणार नाही, तर पोलिसांना तांत्रिकदृष्ट्या सक्षम करणे गरजेचे आहे. केवळ पदव्या देणारे शिक्षण नको, तर नैतिक मूल्ये आणि कायद्याचा आदर शिकवणारे शिक्षण हवे. जलदगती न्यायालयांची संख्या वाढवून गुन्हेगारांना जरब बसेल अशा पद्धतीने निकालांचा वेग वाढवावा लागेल. जगातील महासत्तांच्या रांगेत स्थान मिळविण्याचे स्वप्न देश पाहत आहे; परंतु या झगमगत्या चित्रामागे एक काळी छाया सातत्याने गडद होत चालली आहे- ती म्हणजे वाढती गुन्हेगारी. आर्थिक प्रगतीच्या रथाला सामाजिक असुरक्षिततेचा शाप लागला असेल, तर तो विकास टिकाऊ ठरू शकत नाही. कारण कोणतीही महासत्ता केवळ अर्थव्यवस्थेच्या बळावर घडत नाही; ती घडते समाजातील सुरक्षितता, न्याय, नैतिकता आणि नागरिकांच्या विश्वासाच्या पायावर. राष्ट्रीय गुन्हे नोंद नोंदणी विभागाच्या ताज्या आकडेवारीने पुन्हा एकदा हे वास्तव उघड केले आहे.

आज देशात दर काही मिनिटांनी होणारे खून, बलात्कार, अपहरण, आर्थिक फसवणुकीचे गुन्हे आणि झपाट्याने वाढणारे सायबर अपराध ही केवळ आकडेवारी नाही, तर भारतीय समाजातील वाढत्या अस्थैर्याची चिन्हे आहेत. एका बाजूला आपण कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल इंडिया आणि स्टार्टअप इकॉनॉमीच्या घोषणा करतो आहोत, तर दुसऱ्या बाजूला सामान्य नागरिक स्वतःच्या सुरक्षिततेबाबत अस्वस्थ आहेत. रात्री महिलांना सुरक्षितपणे बाहेर फिरता येणे, वृद्धांनी ऑनलाईन व्यवहार करताना फसवणुकीची भीती न बाळगणे किंवा तरुणांनी उज्ज्वल भविष्यासाठी आत्मविश्वासाने जगणे ही मूलभूत हमी समाजात उरली नाही, तर विकासाची भाषा कितीही मोठी असली तरी पोकळ ठरते. गुन्हेगारीवाढीचे स्वरूपही आता बदलत चालले आहे. पूर्वी गुन्हे म्हणजे रस्त्यावरची चोरी, दरोडे, मारामाऱ्या किंवा स्थानिक टोळ्यांचा दहशतवाद असे चित्र होते. आज गुन्हेगारांचा चेहरा अधिक आधुनिक झाला आहे. हातात शस्त्राऐवजी आता त्यांच्याकडे संगणक, मोबाईल आणि डेटा आहे. सायबर फसवणूक, डिजिटल आर्थिक गुन्हे, ओटीपी घोटाळे, ऑनलाईन ब्लॅकमेलिंग आणि 'सोशल मीडिया'द्वारे होणारे मानसिक शोषण या नव्या गुन्हेगारीने समाजाला वेढले आहे. गुन्हेगार आता रस्त्यावर धोका पत्करत नाहीत, तर इंटरनेटच्या आडून लाखो लोकांना लुबाडत आहेत. दुर्दैवाने आपल्या पोलिस यंत्रणा आणि न्यायव्यवस्था अजूनही मोठ्या प्रमाणावर पारंपरिक पद्धतींमध्ये अडकलेल्या दिसतात. आधुनिक गुन्हेगारांशी लढण्यासाठी आवश्यक असलेली डिजिटल फॉरेन्सिक क्षमता, डेटा विश्लेषण, सायबर सज्जता आणि तांत्रिक मनुष्यबळ अद्याप अपुरे आहे.

महिलांविरुद्ध वाढणारे अपराध ही तर अधिक गंभीर बाब आहे. समाजाची सभ्यता त्याने महिलांना दिलेल्या सुरक्षिततेवर मोजली जाते; परंतु देशातील अनेक राज्यांमध्ये बलात्कार, छेडछाड, घरगुती हिंसा, अपहरण आणि लैंगिक अत्याचाराच्या घटना सातत्याने वाढताना दिसत आहेत. ही केवळ कायद्याची समस्या नाही, तर समाजाच्या मानसिकतेची समस्या आहे. आर्थिक प्रगती झाली, शहरे स्मार्ट झालीत, इंटरनेट गावोगावी पोहोचले, तरी स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलत नसेल, तर तो विकास अपूर्णच राहणार. विश्वगुरु होण्याचा दावा करणाऱ्या राष्ट्रात महिलांना अजूनही भीतीच्या सावटाखाली जगावे लागत असेल, तर आत्मपरीक्षणाची आवश्यकता आहे.

याहून अधिक चिंताजनक बाब म्हणजे वाढती मानसिक अस्थिरता. विद्यार्थ्यांच्या आणि बेरोजगारांच्या आत्महत्या वाढत आहेत. स्पर्धेच्या दबावाखाली करीअरच्या अनिश्चिततेत आणि बेरोजगारीच्या छायेत तरुण पिढी तुटत चालली आहे. देशातील तरुणाई आत्मविश्वासाने आणि सुरक्षिततेच्या भावनेने जगत असेल तरच आर्थिक महासत्ता होण्याचे स्वप्न साकार होऊ शकते, परंतु आज अनेक तरुणांना भविष्य धूसर दिसते आहे. उच्च शिक्षण असूनही रोजगार नाही, रोजगार असला तरी स्थैर्य नाही आणि स्थैर्य नसल्याने मानसिक शांतता नाही. ही साखळी समाजात असंतोष निर्माण करते. अनेकदा हाच असंतोष गुन्हेगारीचे रूप धारण करतो. गुन्हेगारी वाढीमागे केवळ आर्थिक कारणे नाहीत, तर सामाजिक आणि नैतिक अधःपतनाचाही त्यात मोठा वाटा आहे.

समाजात झपाट्याने वाढणारी भौतिकतावादी मानसिकता, 'सोशल मीडिया'वरून निर्माण होणारी दिखाऊ जीवनशैली, जलद श्रीमंत होण्याची हव्यासपूर्ण स्पर्धा आणि नैतिक मूल्यांची होत असलेली घसरण यामुळे अनेक जण चुकीच्या मार्गाकडे वळत आहेत. भ्रष्टाचार, राजकीय हस्तक्षेप, न्यायालयीन प्रक्रियेतील विलंब आणि गुन्हेगारांविषयीची भीती कमी होणे हेही गुन्हेगारीला खतपाणी घालणारे घटक आहेत. समाजात कायद्याचा धाक कमी होतो आणि पैशाच्या किंवा सत्तेच्या जोरावर गुन्हेगार सुटू शकतात, अशी भावना निर्माण होते, तेव्हा गुन्हे वाढणे अपरिहार्य ठरते. भारताला खऱ्या अर्थाने महासत्ता व्हायचे असेल तर केवळ जीडीपी वाढवून चालणार नाही. महासत्ता होण्यासाठी समाजात सुरक्षिततेची भावना, न्यायव्यवस्थेवर विश्वास, महिलांचा सन्मान, युवकांसाठी संधी आणि नागरिकांमध्ये नैतिक जबाबदारीची जाणीव आवश्यक असते. अमेरिका, जपान किंवा युरोपीय देशांची ताकद केवळ त्यांच्या अर्थव्यवस्थेत नाही, तर संस्थात्मक शिस्तीत, कायद्याच्या अंमलबजावणीत आणि नागरिकांच्या सुरक्षिततेत आहे. भारतानेही विकासाचा अर्थ केवळ आर्थिक आकड्यांपुरता मर्यादित न ठेवता सामाजिक आरोग्याशी जोडण्याची गरज आहे.

## रविवारची पत्रे

### युद्ध, होर्मुझ आणि नफा : देश संकटात, खाजगी कंपन्या सुरक्षित?

मे २०२६ मध्ये जागतिक राजकारणात अस्थिरतेचे ढग गडद होत असताना इराण, इस्रायल आणि अमेरिका यांच्यातील संघर्ष उघड युद्धाच्या उंबरठ्यावर पोहोचला. त्याचा थेट परिणाम जागतिक तेल पुरवठ्यावर झाला. विशेषतः जगातील सर्वांत संवेदनशील सागरी मार्ग असलेल्या होर्मुझ सामुद्रधुनीमधून होणारी तेल वाहतूक धोक्यात आली. जगातील सुमारे २० टक्के कच्च्या तेलाची वाहतूक या एकाच मार्गावर अवलंबून आहे. या मार्गात अडथळे, हल्ल्यांची भीती आणि विमा खर्चातील प्रचंड वाढ यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात इंधन दर उसळले. परिणामी अनेक देशांमध्ये इंधन पुरवठा कमतरतेची भीती निर्माण झाली. अशा वेळी भारतासारख्या आयात-निर्भर देशाने अत्यंत सावध धोरण अवलंबणे अपेक्षित होते; पण वास्तव वेगळेच होते. देशांतर्गत गरज, संभाव्य तुटवडा आणि भविष्यातील संकटाचा अंदाज असतानाही रिलायन्स पेट्रोलियम कंपनीसारख्या खाजगी कंपन्यांनी संधी साधली. होर्मुझ संकटामुळे आशियाई बाजारात डिझेल व विमान इंधनाला मोठे प्रीमियम मिळत असताना, भारतातून मोठ्या प्रमाणावर इंधन निर्यात करण्यात आले. देशाला भविष्यात इंधन टंचाईचा धोका असताना, परदेशात इंधन विकून नफा कमावला गेला, ही वस्तुस्थिती अस्वस्थ करणारी आहे.

एका बाजूला सरकारी तेल कंपन्या नफा न पाहता देशातील पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी झगडत आहेत. युद्धजन्य परिस्थितीत साठे वाढविणे, दर नियंत्रणात ठेवणे आणि जनतेत घबराट न पसरू देणे ही जबाबदारी त्यांच्यावरच येते. दुसऱ्या बाजूला खाजगी कंपन्या मात्र बाजाराचा नियम सांगत इंधन परदेशात वळवतात. हा फरक केवळ व्यावसायिक धोरणांचा नाही, तर राष्ट्रीय जबाबदारीचा आहे.

होर्मुझ सामुद्रधुनीतून तेल वाहतूक विस्कळीत होण्याची शक्यता असताना देशांतर्गत इंधन साठवण आणि पुरवठ्याला प्राधान्य देणे गरजेचे होते. मात्र, स्पेशल इकॉनॉमी झोन सवलतींच्या आडून निर्यातींना प्रोत्साहन दिले गेले. परिणामी देशाला भविष्यातील संकटासाठी कमी साठा, सामान्य जनतेसाठी महाग इंधन आणि खाजगी कंपन्यांसाठी सुरक्षित नफा हे चित्र गंभीर धोरणात्मक अपयश दर्शवते.

इराण-इस्रायल-अमेरिका संघर्ष आणि होर्मुझ सामुद्रधुनीतील अस्थिरता ही केवळ परदेशी बातमी नाही; ती भारताच्या ऊर्जा सुरक्षेशी थेट जोडलेली आहे. अशा काळात जर खाजगी कंपन्यांना मोकळे रान दिले, तर देश संकटात आणि कॉर्पोरेट नफ्यात हीच खाजगीकरणाची ओळख बनेल. ऊर्जा क्षेत्रात नफा नव्हे, राष्ट्रहित प्रथम हा स्पष्ट नियम नसेल, तर पुढील युद्ध किंवा संकटात देश अधिक असुरक्षित बनेल आणि त्याची किंमत नेहमीप्रमाणे सामान्य नागरिकालाच मोजावी लागेल.

**मुकेश अग्रवाल**/तिरोडा/९३२६८८०३८०

### देहाकडून देवाकडे...

'देहाकडून देवाकडे जाताना मध्ये देश लागतो आणि आपण या देशाचे देणे लागतो.' ही ओळ अत्यंत गूढ, विचारप्रवर्तक आणि जीवनमूल्य सांगणारी आहे. यात व्यक्ती, समाज, राष्ट्र आणि अध्यात्म यांचा सुंदर संगम दिसून येतो. मनुष्य जन्माला येतो तेव्हा तो फक्त एक देह असतो. त्याचे आयुष्य हळूहळू अनुभवांनी, संस्कारांनी आणि कर्तृत्वाने समृद्ध होत जाते. शेवटी प्रत्येकाचा प्रवास देवाकडे म्हणजेच सत्य, चिरंतनता आणि आत्मिक समाधानाकडे सुरू असतो. पण या दोन टोकांच्या प्रवासात एक महत्त्वाचा दुवा असतो, तो म्हणजे देश. आपला जन्म ज्या मातीत होतो, ज्या भूमीत आपण वाढतो, शिक्षण घेतो, संस्कार मिळवितो, त्या देशाचे आपल्यावर अनंत उपकार असतात. आपल्या आई-वडिलांप्रमाणेच देश ही आपल्याला ओळख, भाषा, संस्कृती, सुरक्षितता आणि अस्तित्व देतो. म्हणूनच आपण या देशाचे देणे लागतो, ही भावना प्रत्येक नागरिकाच्या मनात असली पाहिजे. देशाचे देणे फेडणे म्हणजे केवळ युद्धात शौर्य दाखवणे नव्हे. प्रामाणिकपणे काम करणे, समाजहित जपणे, पर्यावरणाची काळजी घेणे, कायद्याचे पालन करणे, दुसऱ्यांच्या हक्कांचा आदर करणे हीसुद्धा देशसेवाच आहे. शिक्षक विद्यार्थ्यांना घडवतो, शेतकरी अन्न उगवतो, सैनिक सीमांचे रक्षण करतो, डॉक्टर जीव वाचवतो. प्रत्येक जण आपल्या कार्यातून देशाचे ऋण फेडत असतो. आजच्या काळात अनेकदा व्यक्ती स्वतःच्या सुखात, स्वार्थात आणि स्पर्धेत इतकी गुंतून जाते की, देशाप्रति असलेली जबाबदारी विसरते. लक्षात ठेवायला हवे की, आपल्या वैयक्तिक प्रगतीमागे देशाची सामूहिक शक्ती उभी असते. आपण वापरत असलेले रस्ते, शिक्षण व्यवस्था, संविधान, संस्कृती हे सर्व देशाने दिलेले अमूल्य दान आहे. 'देहाकडून देवाकडे' हा प्रवास फक्त आध्यात्मिक नसून सामाजिकही आहे. कारण देव मिळविण्याचा खरा मार्ग मानवसेवा आणि राष्ट्रसेवा यातूनच जातो. स्वामी विवेकानंदांनी सांगितले होते की, 'देशसेवा हीच ईश्वरसेवा आहे.' जेव्हा माणूस स्वतःपुरता विचार न करता समाज आणि देशासाठी जगतो, तेव्हा त्याचा देह अर्थपूर्ण होतो आणि त्याचा आत्मा देवत्वाकडे वाटचाल करतो. शेवटी, देश ही केवळ भौगोलिक सीमा नसते; ती आपल्या अस्तित्वाची ओळख असते. म्हणून प्रत्येकाने मनात देशभक्ती, कृतज्ञता आणि कर्तव्यभावना ठेवून जगले पाहिजे. कारण 'मातीचे ऋण फेडल्याशिवाय मोक्षाचा मार्ग पूर्ण होत नाही.'

**संजय करगुटकर**/नागपूर / ९८९०७५९००५

# लाल दिव्याचा माणूस आणि पालावरची शाळा

"सर, आज वस्तीत येऊ नका, दोन गटांत भांडणं सुरू झाली आहेत. वस्तीतील वातावरण बरोबर नाही" मी काळजीपोटी भ्रमणध्वनीवरून शब्द वदलो. पलीकडून अतिशय संयमी स्वरात उत्तर आलं, "प्रशांतजी, तुम्हाला सांगायचंच विसरलो, माझी पदोन्नतीने बदली झाली. आजच मी अल्पसंख्यक विभागाचा सचिव म्हणून मुंबईला रुजूही झालोय." क्षणभर काळजाचा ठोका चुकला. सभोवतालची शांतता अधिकच गडद झाली. ज्यांच्या येण्याने पालावरच्या पोरांच्या आयुष्यात प्रकाशाची एक नवी तिरीप आली होती, ते मिनाज मुल्ला आता या वस्तीच्या चिखलात आपल्या ई-स्कूटरवर स्वार होऊन येणार नाहीत, हे सत्य पचवणं कठीण होतं. कंठ दाटून आला. फक्त इतकंच बोलू शकलो, "सर, माझ्या उपेक्षित मुलांचं अतोनात नुकसान झालं. तुमच्यासारखा शिक्षक त्यांना पुन्हा लाभणार नाही." साधारण वर्षभरापूर्वीची गोष्ट. महाराष्ट्र शासनाने दूध भेसळीविरुद्ध मोठी मोहीम हाती घेतली होती. भेसळखोरांविरुद्ध अचानक तपासणी आणि धडक कारवाया करण्यासाठी जिल्हास्तरीय समित्या स्थापन करण्यात आल्या होत्या. या पथकात अपर पोलिस अधीक्षक, सहआयुक्त (अन्न व औषध प्रशासन) आणि उपायुक्त (पशुसंवर्धन) यांचा समावेश होता. याच एका महत्त्वाच्या समितीच्या बैठकीत अपर जिल्हाधिकारी मिनाज गनी जन्नत मुल्ला हे अध्यक्ष होते आणि मी सचिव.

एक महत्त्वाची बैठक संपल्यावर प्रोसिडिंगवर स्वाक्षरी घेताना मी सहज भटक्या विमुक्त परिषदेचा भटक्या समाजाच्या वस्त्यांमध्ये जाऊन त्यांच्याशी एकरूप होऊन त्यांच्याच वस्तीत चालविला गेलेला शैक्षणिक उपक्रम पालावरच्या शाळेच्या प्रकल्पाबद्दल त्यांना माहिती दिली. समाजाच्या मुख्य प्रवाहापासून तुटलेल्या त्या भटक्या समाजाची व्यथा मांडली. ते फक्त इतकंच म्हणाले, "प्रशांतजी, छान संकल्पना आहे. वेळ मिळाला तर नक्की येईल गोंदिया येथील पालावरची शाळा बघायला." जिल्ह्याचं इतकं व्यापाचं पद सांभाळणारा माणूस खरोखर या उपेक्षित वस्तीत येईल, यावर माझा फारसा विश्वास नव्हता. पण त्याच दिवशी सायंकाळी वस्तीत अचानक लाल दिव्याची गाडी उभी राहिली. सरांनी भटक्या वस्तीचे भीषण वास्तव पाहिले, समाजाची मागासलेली अवस्था पाहिली, मुलांची शिक्षणाची गोडी पाहिली आणि थेट विचारलं, "मी या मुलांना शिकवलं तर चालेल काय?" जिल्ह्याचा एवढा मोठा अधिकारी जेव्हा स्वतःहून वंचितांच्या पोरांना शिकवण्याची विचारणा करतो, तेव्हा ते त्या मुलांचं आणि आमच्या पालावरच्या शाळेचं मोठं भाग्यच असतं. पण मनात एक शंका होतीच; कारण कचरा गोळा करणाऱ्या, भीक मागणाऱ्या आणि भटक्या समाजाच्या या वस्तीत येणं सोपं नसतं आणि समजा कुणी आलं तरी इथे निरंतरता टिकवणं त्याहून कठीण.

आजवरचा अनुभव असा की, अनेक जण सुरुवातीला मोठ्या उत्साहाने येतात. पण इथल्या मुलांच्या सामाजिक वातावरणामुळे होणारी ओढाताण, अभ्यास न करण्याची वृत्ती आणि मुलांच्या उपस्थितीतील अनियमितता पाहून त्यांचा तो उत्साह लवकरच ओसरतो. पुन्हा पुन्हा तेच शिकवावं लागल्यामुळे शिकवणाऱ्याचा धीर सुटतो आणि हळूहळू त्यांचं येणं बंद होतं. मलाही असंच वाटलं... मुल्ला सर येतील आणि मुलांच्या या अवखळपणामुळे, इथल्या प्रतिकूल परिस्थितीमुळे चार दिवसांत निघून जातील; पण मुल्ला सर वेगळ्या मातीचे निघाले.

ते रोजच नियमित शाळेवर येऊ लागले. शाळेवर आल्यावर सरांची नजर केवळ पुस्तकावर नसायची, तर ती मुलांच्या प्रक्रियेवर आणि त्यांच्या प्रगतीवर असायची. पालावरच्या शाळेत आपण शासनाची कुठलीही मदत न घेता परिषदेमार्फत समाज जागृती करून समाजातील दानशूर व्यक्तींमार्फत आलेल्या मदतीमुळे मुलांना सर्व शैक्षणिक गरजेच्या वस्तू पुरवत होतोच; पण त्या पलीकडे जाऊन काही लहान-लहान गोष्टींची उणीव सरांच्या चाणाक्ष नजरेला जाणवली की, कुठलाही बडेजाव न मिरवता, जणू घरच्याच एखाद्या जबाबदार माणसाने आपल्या लेकरांच्या कौतुकासाठी काहीतरी मायेने आणावे, अगदी त्याच हक्काने आणि आपुलकीने दुसऱ्याच दिवशी त्या वस्तू सरांच्या हातात असायच्या.

अशाच एका वनभोजनाच्या वेळी सरांचे एक वेगळेच रूप पाहायला मिळाले. तिथे ते अधिकारी नव्हते, तर मुलांमध्ये मुलगा बनलेले दोस्त होते. तळ्यात-मळ्यात आणि वाघ-बकरीसारख्या खेळांत ते मुलांसोबत सामील झाले आणि मुलांचा नेता ओळखा या खेळात तर ते स्वतः मुलांचे नेता बनले. त्यांच्या लाल दिव्याच्या गाडीमुळे वस्तीत चलबिचल होते, हे लक्षात आल्यावर त्यांनी शासकीय गाडी बाजूला ठेवली आणि स्वतः ई-स्कूटरवरून वस्तीत येऊ लागले. न चुकता, अगदी घरच्या माणसासारखं! वस्तीतल्या खांबांवर लाईट नाहीत त्यामुळे रात्री वस्ती पूर्ण अंधारात असते, हे पाहिल्यावर कोणालाही आदेश न देता, स्वतः पुढाकार घेऊन १०-१२ खांबांवर लाईट लावून घेतले. मधल्या काळात हायकोर्टातील वरिष्ठ प्रशासकीय न्यायाधीश ए. एस किल्लोर व एम. डब्ल्यू. चांदवानी गोंदिया येथे आले होते. त्या कार्यक्रमाला विधि व न्याय विभागामार्फत मुले आमंत्रित होती. अर्थातच इतक्या मोठ्या कार्यक्रमाला सर स्टेजवर अध्यक्ष म्हणून होते. स्टेजवरूनही आपल्या मुलांची उपस्थिती त्या कार्यक्रमाला लक्षात आल्यानंतर सरांनी आवर्जून सर्व मुलांना स्टेजवर बोलावले. हायकोर्टाच्या दोन्ही न्यायाधीशांना सर्व मुलांचा परिचय करून दिला. भाविक परिषदेच्या पालावरच्या शाळेच्या नावीन्यपूर्ण प्रकल्पाची सर्व माहिती दिली. माझी ओळख जवळ बोलावून भटक्यांसाठी तळमळीने काम करणारा कार्यकर्ता म्हणून सर्वांशी करून दिली. हा सन्मान माझ्या एकट्याचा नव्हता; आमच्या सर्व वंचित समाजाचा होता. अगदी परवाच तर ते वर्गात बोडोमासचे नियम शिकवत होते. सर फळ्यावर लिहीत असताना एखादं पोरगं खाली बसल्या बसल्या त्यांची पँट ओढून हक्काने म्हणायचं, "सर, बाजूला व्हा ना, फळा दिसत नाहीये!" अगदी जिल्ह्याचा सर्वोच्च अधिकारी मुलांच्या त्या ओढाओढीतही हसून बाजूला व्हायचा. आज त्या निरागस मुलांना कदाचित समजणार नाही की त्यांचा शिक्षक किती मोठा अधिकारी होता, पण त्यांना हे नक्कीच आठवेल की एक माणूस होता, जो त्यांच्यासाठी चिखल तुडवत यायचा. मुल्ला सरांची बदली ही केवळ एका सनदी अधिकाऱ्याची बदली नाही, तर पालावरच्या अंधाराशी दोन हात करणाऱ्या एका ध्येयवेड्या सैनिकाची ही रजा आहे. त्यांनी मुलांना केवळ गणित शिकवलं नाही, तर सन्मानाने जगण्याची उमेद दिली.

"ऐकताय ना?" फोनवर सरांचा आवाज पुन्हा आला आणि माझी विचारशृंखला तुटली. डोळ्यांतून टचकन पाणी आलं. केवळ 'बाय सर' म्हणालो आणि जड अंतःकरणाने फोन कट केला. बाहेर रस्त्यावर गाड्यांचा आवाज सुरू होता; माझ्या मनात मात्र एकच हळवा प्रश्न रुंजी घालत होता... उद्यापासून पालावरची ती मुलं कुणाची पँट ओढून हक्काने सांगतील... 'सर, फळा दिसत नाहीये, थोडे बाजूला व्हा ना?'

प्रशासकीय खुर्चीवर बसणारा प्रत्येक माणूस अधिकारी असतोच, पण नियमांच्या पलीकडे जाऊन माणुसकीची ऊब देणारा मिनाज मुल्ला सरांसारखा 'वाली' होणे ऋषी होणं प्रत्येकाला जमेलच असे नाही.

**प्रशांत सुरेश बोरसे**
पालावरची शाळा, भटके विमुक्त कल्याणकारी परिषद, विदर्भ प्रांत.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# राज्य उत्पादन शुल्कच्या पथकावर जमावाकडून जीवघेणा हल्ला

**बीड, 07 जून :** कापसी फाटा येथील हॉटेलवर बनावट दारूवर छापा टाकण्यासाठी गेलेल्या राज्य उत्पादन शुल्कच्या पथकावर जमावाने जीवघेणा हल्ला केल्याची घटना उघडकीस आली आहे. जमावाने अधिकाऱ्यांना मारहाण करत जप्त केलेला विदेशी दारूचा मुद्देमालही हिसकावून नेला.

याप्रकरणी सात जणांवर अमळनेर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. उत्पादन शुल्कचे पथकाला हॉटेल येथे बनावट लेबल लावून विक्री होत असल्याची माहिती मिळाली होती.

पथकाने छापा टाकला. यावेळी हॉटेलचाल याच्या काउंटरची तपासणी केली असता तेथे देशी दारूच्या ३५ बाटल्या असा एकूण ८ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल आढळून आला. कारवाई सुरू असतानाच जमाव हॉटेलवर चालून आला. हुज्जत घालत अधिकाऱ्यांना शिवीगाळ करत मारहाण केली. दोघांनी दारूच्या ३० बाटल्या हिसकावून पोबारा केला. घटनेची माहिती मिळताच अमळनेर पोलिस ठाण्याचे उपनिरीक्षक कृष्णा चव्हाण व पथकाने घटनास्थळी धाव घेतली. सर्वांवर शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला.

# शिवराज्याभिषेक दिनानिमित्त भव्य पालखी सोहळ्यासह 62 शिवप्रेमींचे रक्तदान

**माजलगांव (प्रतिनिधी)** :** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त माजलगांव शहरात शनिवारी (दि. ६ जून) सकाळी १० वाजता विविध सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत भव्य पालखी सोहळा काढण्यात आला. शिवभक्तांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण शहर शिवमय झाले होते.





शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून शिवतीर्थ परिसर, एस.टी. बसस्थानक, माजलगांव येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरास शिवप्रेमी नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. एकूण *६२ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपत मानवतेचा संदेश दिला.* या उपक्रमामुळे गरजू रुग्णांना जीवनदान मिळण्यास मदत होणार असल्याने सर्व स्तरांतून या उपक्रमाचे कौतुक करण्यात आले.

पालखी सोहळ्याची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. ढोल-ताशांचा गजर, भगवे ध्वज, शिवगर्जना आणि शिवकालीन वेशभूषा यामुळे वातावरण भारावून गेले होते. शहरातील प्रमुख मार्गांवरून काढण्यात आलेल्या या पालखी सोहळ्याने नागरिकांचे विशेष लक्ष वेधून घेतले. यावेळी रमेश उर्फ गजू चौधरी, अभिजित अशोक जाधव, ज्ञानेश्वर विघ्ने, सचिन कळाळे, लखन सावंत, बाळू ताकट, ऋषिकेश सोळंके, वैभव सोळंके, आदित्य मुळे, यश चुंबळे, वैभव राठोड, आदित्य शिंदे, करण ढगे यांच्यासह असंख्य शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिवराज्याभिषेक दिनानिमित्त आयोजित पालखी सोहळा आणि रक्तदान शिबिरामुळे माजलगाव शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. शिवरायांच्या विचारांचा जागर करत समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आल्याने नागरिकांनी या कार्यक्रमाचे स्वागत केले.

# जन शिक्षण संस्थान बीडच्या वतीने जिल्ह्यात विविध ठिकाणी पर्यावरण दिन कार्यक्रम संपन्न

**बीड :** कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय भारत सरकार द्वारा, व दीनदयाल शोध संस्थान, जन शिक्षण संस्थान बीडच्या वतीने बीड, बहिरवाडी,मौज,शिरूर,गेवराई धारूर, माजलगाव, पाटोदा , केज इत्यादी ठिकाणी असिस्टंट ड्रेस मेकर, ब्युटी केअर असिस्टंट, असिस्टंट कम्प्युटर टेक्निशियन, हॅन्ड एम्ब्रॉयडरी, इत्यादी प्रशिक्षण सुरू आहेत. प्रशिक्षण दरम्यान येणारे कार्यक्रम त्याचे महत्त्व सांगून जाणीव जागृती केली जाते.

जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने वृक्ष लागवड, वृक्ष संवर्धन, वृक्षतोडीमुळे होणारा पर्यावरणाचा ऱ्हास, व त्याचा मानवी जीवनासह इतर सजीवावर होणारे विपरीत परिणाम, प्लास्टिकचा वापर, प्लास्टिकचा वापरामुळे होणारे दुष्परिणाम, प्लास्टिकला पर्याय कापडी व जूट बॅग चा उपयोग

इत्यादी मुद्द्यांना अनुसरून सर्व प्रशिक्षण केंद्रावर माहिती देण्यात आली. तसेच वृक्ष लागवड करून त्याचे महत्त्व पटवून देण्यात आले.

जन शिक्षण संस्थानचे संचालक श्री गंगाधरजी देशमुख यांच्या मार्गदर्शनानुसार व कार्यक्रम अधिकारी, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी , सर्व प्रशिक्षिका व प्रशिक्षणार्थींच्या प्रयत्नातून हे कार्यक्रम संपन्न झाले.

एकूण 185प्रशिक्षणार्थींनी कार्यक्रमात सहभाग नोंदवला.

# हरवलेले सव्वादोन लाखांचे सोन्याचे दागिने मालकिणीला परत

**अंबाजोगाई :** अंबाजोगाई तालुक्यातील चनई येथील रहिवासी रेखा युवराज क्षीरसागर यांचे सुमारे ₹2 लाख 25 हजार किमतीचे सोन्याचे दागिने पोलिसांच्या तत्परतेमुळे पुन्हा मिळाले आहेत.



मिळालेल्या माहितीनुसार, रेखा क्षीरसागर या दि. 2 जून 2026 रोजी सकाळी लोखंडी सावरगाव येथून शिवाजी चौकाकडे ऑटो रिक्षाने प्रवास करत होत्या. ऑटो मध्ये बसण्याच्या घाईत त्यांच्या हातातील दागिन्यांची पिशवी शिवाजी चौक येथील ऑटो पॉईंटजवळ खाली पडली. मात्र त्यांना याची जाणीव न झाल्याने त्या पुढे निघून गेल्या.

दुसऱ्या दिवशी त्यांनी अंबाजोगाई पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीनंतर पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली असता, एक व्यक्ती सदरची पिशवी उचलून घेऊन जात असल्याचे आढळून आले. पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत त्या व्यक्तीची ओळख खंडू अंबादास साळवे (वय 65, रा. भीमनगर, मांडवा रोड, परळी वैजनाथ) अशी पटवली.

पोलिसांनी त्यांच्या घरी जाऊन चौकशी केली असता, त्यांनी प्रामाणिकपणे पिशवी आपल्या ताब्यात असल्याचे सांगून ती पोलिसांकडे सुपूर्द केली. पिशवीमध्ये 56 मणी, दोन सोन्याचे पिळ्याचे पेंडल आणि दोन सोन्याचे झुंबर असे सुमारे दीड तोळे वजनाचे व अंदाजे ₹2.25 लाख किमतीचे सोन्याचे दागिने आढळून आले.

त्यानंतर माननीय पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांच्या हस्ते सदरचे दागिने रेखा क्षीरसागर यांना परत करण्यात आले. हरवलेले मौल्यवान दागिने अल्पावधीत शोधून काढण्यासाठी पोलीस हवालदार पांडुरंग काळे व पोलीस अंमलदार हनुमंत चादर यांनी सीसीटीव्ही फुटेजची बारकाईने तपासणी करून संबंधित व्यक्तीचा शोध घेत मोलाची कामगिरी बजावली.

या प्रकरणात प्रामाणिकपणा दाखवत दागिन्यांची पिशवी सुरक्षित ठेवून ती पोलिसांच्या स्वाधीन करणाऱ्या खंडू अंबादास साळवे यांचेही सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# बीडच्या शिवारात शेतीकामांची लगबग; बळिराजाची पूर्वतयारी; मशागतीला गती

**बीड:** उन्हाळ्याचे कडक ऊन हळूहळू सुसह्य होऊ लागले आहे आणि आकाशाच्या कोपऱ्यात ढगांची पुसटशी गर्दी दिसू लागली आहे. मृग नक्षत्र अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपल्याची जाणीव होताच, संपूर्ण बीड जिल्ह्यातील शिवाराचे रूप पालटले आहे. डोक्याला रुमाल बांधून, हातात नांगराची धुरा धरत किंवा ट्रॅक्टरच्या आवाजासह शेतकरी शेतात दाखल होत आहेत. वेळेवर पेरणी झाली तरच पीक हाती येईल या एकाच ध्यासाने बळिराजा सध्या शिवारात दिवस-रात्र घाम गाळत आहे.

नांगरणी, पंजी, पाळी मारणे आणि शेतातील केरकचरा वेचणे या कामांनी वेग घेतला असून, खरीप पूर्वतयारी आता अंतिम टप्प्यात पोचली आहे. कपाळावर चिंतेच्या आठ्या असल्या, तरी दरवर्षीप्रमाणे यंदाही चांगल्या पावसाच्या एका आशेवर बीडचा शेतकरी नव्या उमेदीने मातीशी नाते सांगायला सज्ज झाला आहे.

यंदा बी-बियाणे, रासायनिक खते आणि इंधनाच्या किमती गगनाला भिडल्याने शेतीचा सुरवातीचा खर्चच मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यातच ग्रामीण भागात जाणवणारी तीव्र मजूरटंचाई शेतकऱ्यांची डोकेदुखी ठरत आहे. एकेकाळी बीडच्या शेतीची मुख्य ताकद असलेल्या देखण्या बैलजोड्या आता बोटावर मोजण्याइतक्याच उरल्या आहेत. दावणीला जनावरे कमी झाल्यामुळे शेतकऱ्यांना आधुनिक यंत्रांचा आधार घ्यावा लागत आहे; मात्र ट्रॅक्टरच्या वाढत्या भाड्यामुळे आणि डिझेलच्या किमतींमुळे खर्चात आणखी भर पडत आहे. अशा प्रतिकूल परिस्थितीतही नवनवीन कृषी तंत्रज्ञान व प्रयोगांच्या माध्यमातून उत्पादन वाढविण्याचा प्रामाणिक प्रयत्न शेतकरी करत आहेत.

मागील खरीप हंगामात झालेल्या अतिवृष्टीमुळे बीड जिल्ह्यातील पिकांचे अतोनात नुकसान झाले होते. शासनाने पंचनामे करून नुकसान मान्य केले असले, तरी अजूनही अनेक शेतकऱ्यांच्या खात्यावर सोयाबीन पीकविम्याची रक्कम जमा झालेली नाही. आर्थिक कोंडीत सापडलेल्या शेतकऱ्यांमध्ये यामुळे तीव्र नाराजी असून, नवीन पेरणीपूर्वी हा हक्काचा विमा मिळावा अशी मागणी होत आहे.

# तुलसी इंग्लिश स्कूलमध्ये 'नेचर कोर्ट'द्वारे पर्यावरण जनजागृती

**बीड (प्रतिनिधी) :** येथील देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी इंग्लिश स्कूलमध्ये शुक्रवारी जागतिक पर्यावरण दिन विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने विद्यार्थ्यांनी नेचर कोर्ट ही नाटिका सादर करून पर्यावरण जनजागृती केली. तसेच विविध उपक्रमांच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. या कार्यक्रमास शाळेच्या प्राचार्या उमा जगतकर यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सक्रिय सहभाग नोंदवून कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडला.

# जागतीक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्यात वृक्षारोपण



**माजलगाव प्रतिनिधी :** प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून शुक्रवारी कारखान्याचे ज्येष्ठ संचालक तथा साखर संघ मुंबईचे उपाध्यक्ष माननीय आमदार प्रकाशदादा सोळंके, चेअरमन वीरेंद्र सोळंके, व्हाईस चेअरमन जयसिंग भैया सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सूचनेनुसार कारखाना स्थळी विविध वृक्ष लागवडीचा कार्यक्रम घेण्यात आला. जागतिक पर्यावरण दिन व केंद्र शासनाच्या" एक पेड मा के नाम", या मोहिमेअंतर्गत कारखान्याचे संचालक आबासाहेब गायकवाड, कार्यकारी संचालक

आर.सी. बडगुजर यांच्या हस्ते पन्नास वृक्षांचे रोपण करण्यात आले . माहे ऑक्टोबर 2026 मध्ये 500 वृक्ष लावण्याचा कारखान्याचा संकल्प असून, कारखान्याचे वतीने आतापर्यंत 12209 विविध प्रकारची झाडे लावण्यात आलेली असून ती चांगल्या पद्धतीने जोपासले आहेत. कारखाना प्रतिवर्ष वृक्षारोपण करून सामाजिक बांधिलकी व पर्यावरण संतुलन राखण्यासाठी कारखाना व्यवस्थापन प्रयत्नशील आहे. यावेळी जनरल मॅनेजर (इंजि)एस,. एस. शिंनगारे, सचिव सुरेश लगड बी.एस. झोडगे, चिफ अकाउंटंट एस.बी. घाडगे, डीस्टलरी मॅनेजर एम.जे. निर्मळ, ऊस पुरवठा अधिकारी बी.एस. वगरे,ऊस विकास अधिकारी ए. टी. स्वामी यांच्यासह कर्मचारी कामगार उपस्थित होते. या कार्यक्रमाचे औचित्य साधून ऊपस्थित खाते प्रमुख आणि विभाग प्रमुख यांच्या हस्ते विविध जातींच्या वृक्षांची लागवड कारखाना कार्यस्थळावर करण्यात आलेली आहे.

# शेतकऱ्यांनी कर्जमाफी योजनेचा लाभ घ्यावा : नवनाथ शिराळे पाटील

**बीड, दि. _ :** देशाचे लोकप्रिय पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदीजी, महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री माननीय देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री माननीय एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री माननीय सूनेत्राताई पवार तसेच मंत्री माननीय पंकजाताई मुंडे यांच्या प्रयत्नांमुळे आणि शेतकरी हिताच्या भूमिकेमुळे राज्यातील पात्र शेतकऱ्यांसाठी दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफीचा महत्त्वपूर्ण निर्णय राबविण्यात आला आहे. या योजनेचा लाभ सर्व पात्र शेतकरी बांधवांनी घ्यावा, असे आवाहन शेतकरी पुत्र तथा भाजपाचे ज्येष्ठ नेते नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी केले आहे.

प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी म्हटले आहे की, ज्या शेतकरी बांधवांकडे दोन लाख रुपयांपेक्षा अधिक कर्ज शिल्लक आहे त्यांनी नियमानुसार उर्वरित रक्कम भरून आपले कर्ज खाते नियमित करावे व कर्जमाफीचा लाभ घ्यावा. तसेच सर्व पात्र शेतकऱ्यांनी आपल्या बँक खात्यांचे केवायसी (KYC) अद्ययावत करून घ्यावे, जेणेकरून योजनेचा लाभ मिळविताना कोणतीही अडचण निर्माण होणार नाही.



शेतकरी हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून त्याच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र व राज्य शासन सातत्याने कार्यरत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठी, शेती उत्पादन खर्च कमी करण्यासाठी आणि कृषी क्षेत्र अधिक सक्षम करण्यासाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी, पीक विमा योजना, मृदा आरोग्य पत्रिका, सिंचन प्रकल्प, कृषी पायाभूत सुविधा विकास तसेच शेतमालाला बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री सूनेत्राताई पवार आणि मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांना आर्थिक बळकटी देण्यासाठी विविध कल्याणकारी योजना प्रभावीपणे राबविल्या जात आहेत. शेतीसाठी पायाभूत सुविधा, जलसंधारण, सिंचन क्षमता वाढ, पीक नुकसान भरपाई, कृषी यांत्रिकीकरण आणि शेतकऱ्यांना थेट आर्थिक मदत यांसारख्या अनेक उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबांना मोठा आधार मिळत आहे.

कर्जमाफीचा निर्णय हा शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देणारा महत्त्वपूर्ण निर्णय असून त्यातून हजारो शेतकरी कुटुंबांना नव्याने उभारी मिळणार आहे. शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असून त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी कटिबद्ध आहे, असेही नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी नमूद केले आहे.

तरी सर्व पात्र शेतकरी बांधवांनी संबंधित बँकांशी संपर्क साधून आवश्यक प्रक्रिया पूर्ण करावी, आपले केवायसी अद्ययावत करून घ्यावे आणि शासनाच्या या महत्त्वपूर्ण कर्जमाफी योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी केले आहे.

# पूरग्रस्त बंधाऱ्यांच्या दुरुस्तीसाठी 1.50 कोटींचा निधी मंजूर

**बीड, 07 जून :** सप्टेंबर २०२५ मध्ये आष्टी, पाटोदा व शिरूर कासार तालुक्यात झालेल्या अतिवृष्टी व महापुरामुळे नुकसानग्रस्त कोल्हापुरी पद्धतीच्या बंधाऱ्यांच्या दुरुस्ती कामांना अखेर मंजुरी मिळाली असून, आ. सुरेश धस यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे निधी उपलब्ध झाला आहे. पूर परिस्थितीची दखल घेत आमदार सुरेश धस यांनी अधिवेशनात हा प्रश्न प्रभावीपणे मांडत शासनाकडे पाठपुरावा केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली मदत व पुनर्वसन विभागाच्या योजनेअंतर्गत तसेच नाम फाउंडेशन व जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून सुमारे १.५० कोटी रुपयांचा निधी मिळाला आहे. नदी खोलीकरण, रुंदीकरण, भराव बांधकाम व दुरुस्तीची कामे नाम फाउंडेशन व आ. सुरेश धस मित्र मंडळाच्या माध्यमातून वेगाने सुरू असून पावसाळ्यापूर्वी ती पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे.

# तूर पिकाच्या नव्या वाणांमुळे शेती क्षेत्रात होणार आमूलाग्र बदल; मका उत्पादकांनाही मोठा दिलासा

**नांदेड , दि. ७ (प्रतिनिधी ):** भारतातील शेती व्यवसायाला आधुनिकतेची जोड देत शेतकऱ्यांचे भविष्य अधिक उज्ज्वल करण्यासाठी डीसीएम श्रीराम लिमिटेडच्या श्रीराम फार्म सोल्युशन्सने एक मोठे पाऊल उचलले आहे. विदर्भ विभागीय कार्यक्रम नागपूर येथे नुकताच पार पडला, यावेळी कंपनीने आपली अत्याधुनिक पीक संरक्षण, विशेष वनस्पती पोषण आणि संशोधनाधारित बियाणे उत्पादने बाजारात सादर केली. विदर्भातील प्रमुख चॅनेल भागीदार आणि शेतकऱ्यांच्या उपस्थितीत पार पडलेला हा सोहळा महाराष्ट्रातील कृषी क्षेत्रासाठी एक नवी पहाट ठरणार आहे.

या क्रांतिकारी उपक्रमाबद्दल बोलताना श्रीराम फार्म सोल्युशन्सचे कार्यकारी संचालक व व्यवसाय प्रमुख संजय छाब्रा म्हणाले, "श्रीराम फार्म सोल्युशन्समध्ये नवोन्मेष आमचे ध्येय नाही, आम्ही सेवा देत असलेल्या प्रत्येक शेतकऱ्याला दिलेले आमचे वचन आहे. या नव्या उत्पादनांचे लोकार्पण आधुनिक शेतीच्या क्षमतांना नव्याने परिभाषित करण्याच्या आमच्या प्रवासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे.



अत्याधुनिक बियाणे, पीक संरक्षण आणि पीक पोषण उपाय थेट शेतकऱ्यांच्या हातात देऊन आम्ही त्यांना केवळ अधिक चांगली पिके घेण्यासाठी नव्हे, तर अधिक उज्ज्वल भविष्य घडविण्यासाठी सक्षम करत आहोत." हा उपक्रम ग्रामीण भागातील शेतीचे चित्र बदलून शेतकऱ्यांच्या जीवनात समृद्धी आणेल, असा विश्वास व्यक्त होत आहे.

बदलता हवामान आणि वाढत्या किडींमुळे त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांसाठी कंपनीने जागतिक दर्जाचे पेटंटप्राप्त तंत्रज्ञान आणले आहे. यामध्ये 'श्रीराम सेनकुशा' हे जपानी तंत्रज्ञानावर आधारित कीटकनाशक सादर करण्यात आले आहे, जे फवारणीनंतर अवघ्या ३० मिनिटांत पावसाचा परिणाम सहन करू शकते. फलोत्पादनातील महत्त्वाच्या रोगांवर मात करण्यासाठी 'श्रीराम झारविन' हे भारतातील पहिले पेटंटप्राप्त बुरशीनाशक आणले गेले आहे, तर मका उत्पादक शेतकऱ्यांसाठी 'श्रीराम एडेलॉन' हे प्रभावी तणनाशक वरदान ठरणार आहे. याशिवाय, जमिनीचे ३६० अंश आरोग्य सुधारण्यासाठी आणि उत्पादनाचा दर्जा टिकवण्यासाठी 'श्रीराम फर्मप्लस' आणि 'श्रीराम सिम्बिओ' ही जैविक पोषण उत्पादने लॉंच करण्यात आली आहेत. तसेच, तूर उत्पादकांसाठी कमी आणि जास्त कालावधीचे दोन विशेष संशोधनाधारित वाण उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

# बीडच्या लेकींची गगनभरारी; ऊसतोडणी कामगाराच्या चार सख्ख्या बहिणी एकाच वेळी झाल्या पोलीस

## डोंगराळ भागातील जिवाचीवाडी गावच्या कन्यकांचा मुंबई पोलीस दलात डंका

**बीड :** ऊसतोड कामगारांचा जिल्हा अशी ओळख असलेल्या बीड जिल्ह्यातील चार सख्ख्या बहिणींनी मिळवलेल्या अभूतपूर्व यशामुळे संपूर्ण राज्यात कौतुकाचा वर्षाव होत आहे. एका सामान्य ऊसतोडणी करणाऱ्या शेतकऱ्याच्या चार मुलींनी थेट मुंबई पोलीस दलात स्थान मिळवून गगनभरारी घेतली आहे. कोणत्याही प्रकारची पुरेशी संसाधने उपलब्ध नसताना आणि गरिबीशी दोन हात करत या तरुणींनी मिळवलेले हे यश केवळ त्यांच्या कुटुंबासाठीच नाही, तर संपूर्ण जिल्ह्यासाठी एक मोठा प्रेरणास्थान बनले आहे.

बीड जिल्ह्यातील डोंगराळ भागात वसलेल्या जिवाचीवाडी या छोट्याशा खेड्यातील ऊसतोड कामगार हनुमंत चौरे यांच्या या चारही मुली आहेत. उषा, अर्चना, गीतांजली आणि शितल अशी या रणरागिणींची नावे आहेत. जिवाचीवाडी सारख्या ग्रामीण आणि दुर्गम भागात अनेकदा मुलींच्या सुरक्षेचे कारण पुढे करून त्यांचे बालपणातच विवाह लावून देण्याची प्रथा पाहायला मिळते. मात्र, अशा रूढी-परंपरांना आणि सामाजिक चौकटीला छेद देत या चारही बहिणींनी शिक्षणाचा आणि खाकी वर्दीचा मार्ग निवडला. त्यांचे आई-वडील आजही पोटाची खळगी भरण्यासाठी ऊस तोडणीचे अत्यंत कष्टाचे काम करतात. कुटुंबाची आर्थिक परिस्थिती कमालीची हालाखीची असतानाही, या मुलींनी आपल्या



मनात खाकी वर्दीचे स्वप्न जिवंत ठेवले.

असंख्य आर्थिक अडचणी, कौटुंबिक आव्हाने आणि मर्यादा असूनही वडील हनुमंत चौरे यांनी आपल्या मुलींच्या शिक्षणात कोणतीही कसर सोडली नाही आणि त्यांच्या स्वप्नांना नेहमीच बळ दिले. वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवून या चारही बहिणींनी अत्यंत जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर मुंबई पोलीस दलाच्या भरती प्रक्रियेत घवघवीत यश संपादन केले. एकाच घरातील चार सख्ख्या बहिणींची एकाच वेळी पोलीस दलात निवड होण्याची ही राज्यातील दुर्मिळ घटना असावी. या कौतुकास्पद कामगिरीमुळे सध्या जिवाचीवाडी गावासह संपूर्ण बीड जिल्ह्यात आनंदाचे वातावरण असून, आई-वडिलांचा ऊर अभिमानाने भरून आला आहे. सोशल मीडियासह सर्वच स्तरातून या चौरे भगिनींवर शुभेच्छा आणि कौतुकाचा वर्षाव होत आहे.

धाराशिव • दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## श्री तुळजाभवानी मातेला एक किलो चांदीची मूर्ती अर्पण

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ जून -**

नांदेड येथील भाविक सचिन सैनाजी खिल्लारे यांनी आज श्री तुळजाभवानी मंदिर येथे दर्शन घेतल्यानंतर देवीच्या चरणी एक किलो वजनाची चांदीची श्री तुळजाभवानी देवींची मूर्ती अर्पण केली.

सचिन खिल्लारे हे आपल्या कुटुंबीयांसह तुळजाभवानी मातेच्या



दर्शनासाठी आले होते. दर्शनानंतर त्यांनी श्रद्धापूर्वक चांदीची मूर्ती अर्पण करून देवीचे आशीर्वाद घेतले.

या प्रसंगी श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या वतीने सचिन खिल्लारे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी विकास वाणी, मनोज कदम तसेच मंदिर संस्थानचे कर्मचारी उपस्थित होते. श्रद्धा आणि भक्तीभावातून केलेल्या या अर्पणाबद्दल उपस्थितांनी खिल्लारे यांचे कौतुक केले.



## संक्षिप्त वृत्त...



### लोहारा येथे शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा

**लोहारा, ७ जून -**

येथील भारतमाता मंदिरात दि.६ जून रोजी हिंदवी स्वराज्याचे संस्थापक व रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांचा शिवराज्याभिषेक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी लोहारा कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती यांच्या हस्ते शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज की जय व जय भवानी, जय शिवरायच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. फटाक्यांची आतषबाजी करून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. कार्यक्रमास संजय दरेकर, प्राचार्य शहाजी जाधव, विरेश स्वामी, गणेश हिप्परगेकर, सतीश गिरी, दत्ताजी जावळे, शंकरजी जाधव यांच्यासह अनेक शिवप्रेमी उपस्थित होते.



### पंचायत समिती कळंब येथे शिवराज्याभिषेक सोहळा उत्साहात

**कळंब, ७ जून -**

पंचायत समिती कळंब येथे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक व रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांचा शिवराज्याभिषेक सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमास पंचायत समिती सभापती प्रा. राजश्री धनंजय वरपे, उपसभापती प्रनिता राहुल चव्हाण, गटविकास अधिकारी सोपान अकेले, गटशिक्षणाधिकारी माळी, कनिष्ठ प्रशासन अधिकारी कुलकर्णी, कृषी विस्तार अधिकारी तावरे तसेच पंचायत समितीचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



### भारतीय सैन्य दलात निवड झालेल्या यश सरडेचा शिवसेनेकडून सत्कार

**इटकळ, ७ जून -**

काक्रंबा येथील शेतकरी पुत्र यश दिलीप सरडे याची भारतीय सैन्य दलात निवड झाल्याबद्दल काक्रंबा शिवसेनेच्या वतीने त्याचा सत्कार करण्यात आला. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत जिद्द व चिकाटीच्या जोरावर मिळविलेल्या यशाबद्दल उपस्थितांनी त्याचे कौतुक केले. यावेळी शिवसेना सोशल मीडिया तालुकाप्रमुख चेतन बंडगर, माजी ग्रामपंचायत सदस्य आप्पाराव म्हेत्रे, ग्रामपंचायत सदस्य सद्दाम मुलाणी, दिलीप बंडगर, सोमनाथ कानडे, दयानंद वाघमारे, शाम सुरवसे, नामदेव झाडे, पप्पू झाडे, पत्रकार राम थोरात, अमित बंडगर, समाधान घोगरे, शुभम घोगरे, आदर्श खंडाळकर यांच्यासह शिवसैनिक व ग्रामस्थ उपस्थित होते. उपस्थितांनी यश सरडे याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# सोलर-पवनचक्की प्रकल्पांवरील चोऱ्यांचा पर्दाफाश; १० गुन्हे उघड

### ६.४२ लाखांचा मुद्देमाल जप्त...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ जून -**

जिल्ह्यातील सोलर प्लांट आणि पवनचक्की प्रकल्पांमधून केबल, वायर व इतर साहित्य चोरी करणाऱ्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश करत दोन आरोपींना ताब्यात घेतले आहे. या कारवाईत चोरीतील तांब्याच्या तारा



आणि गुन्ह्यात वापरलेले वाहन असा एकूण ६ लाख ४२ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

गुप्त माहितीच्या आधारे दि.७ जून रोजी येडशी परिसरात सापळा रचून पोलिसांनी टाटा सुमो वाहनासह दोन संशयितांना ताब्यात घेतले.

चौकशीदरम्यान आरोपींनी तेरखेडा-रुईभर, कौडगाव, ढोकी, साबळेवाडी, आरसोली (ता. भूम), गौरगाव आणि मस्सा (ता. कळंब) परिसरातील सोलर व पवनचक्की प्रकल्पांमधून तांब्याच्या केबल चोरी केल्याची कबुली दिली. पोलिसांनी आरोपींकडून सुमारे १९५ किलो वजनाच्या तांब्याच्या तारा तसेच गुन्ह्यात वापरलेले टाटा सुमो वाहन जप्त केले. या कारवाईमुळे तब्बल १० चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत.



अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये शिवाजी उर्फ नाना संजय काळे (रा. खामकर पारधी पेढी, ता. वाशी) याच्यासह एका विधीसंघर्षग्रस्त बालकाचा समावेश आहे. पुढील तपासासाठी आरोपी व जप्त मुद्देमाल धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आला आहे.

ही कारवाई अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थगुशा.चे पोनि. विनोद इज्जापवार, सपोनि. सुदर्शन कासार आणि त्यांच्या पथकाने यशस्वीरित्या पार पाडली.

### दुचाकी व कारच्या धडकेत महिलेचा मृत्यु

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ जून -**

भरधाव आणि निष्काळजीपणे चालविलेल्या इरटीगा कारमुळे झालेल्या अपघातात एका महिलेचा मृत्यू झाला असून एक जण गंभीर जखमी झाला आहे.

दि.२५ मे रोजी विक्रम यशवंत जगदाळे (रा. उपळा) आणि कस्तुराबाई बलभीम पारवे (रा. बरमगाव) हे दुचाकीवरून जात असताना इरटीगा कार (क्र. एमएच-१२ एलडी-६८७६) चालकाने पुढील कारला पाठीमागून धडक दिली. या अपघातात कस्तुराबाई पारवे या गंभीर जखमी होऊन मृत्युमुखी पडल्या, तर विक्रम जगदाळे हे जखमी झाले. याप्रकरणी आकाश तेरकर यांच्या फिर्यादीवरून धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा केला आहे.

## खड्ड्यांच्या विळख्यात कडकनाथवाडी-बार्शी रस्ता

### जीव मुठीत धरून प्रवास, नागरिकांचा संताप...

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.७ जून -**

वाशी तालुक्यातील कडकनाथवाडी-बार्शी मार्गाची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत असून वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले असून मान्सूनपूर्व पावसामुळे चिखलाचे साम्राज्य निर्माण झाले आहे. त्यामुळे या मार्गावरील वाहतूक धोकादायक बनली आहे.

रस्त्यावरील खड्ड्यांमध्ये पावसाचे पाणी साचत असल्याने वाहनचालकांना खड्ड्यांचा अंदाज येत नाही. परिणामी दुचाकीस्वारांचे संतुलन बिघडून वारंवार छोटे-मोठे अपघात



घडत आहेत. चिखलामुळे वाहने घसरत असून नागरिकांना मोठी कसरत करत प्रवास करावा लागत आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, या रस्त्यावरील अपघातांची मालिका चिंताजनक असून आतापर्यंत तीन जणांचा बळी गेला आहे. त्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. रस्त्याची दुरवस्था वाढत असतानाही संबंधित विभागाकडून कोणतीही ठोस उपाययोजना होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

पावसाळा तोंडावर असताना या मार्गावरील खड्डे तातडीने बुजवून रस्त्याची दुरुस्ती करण्यात यावी तसेच चिखलाची समस्या कायमस्वरूपी दूर करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. अन्यथा भविष्यात आणखी गंभीर अपघात होऊन निष्पाप नागरिकांचे बळी जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

### उमरगा चिवरी येथे विद्युत वायर चोरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ जून -**

उमरगा चिवरी येथील लघु पाटबंधारे तलाव परिसरातून अज्ञात चोरट्यांनी ४,२०० फूट लांबीची विद्युत वायर चोरी केल्याची घटना घडली. चोरीस गेलेल्या वायरची किंमत ८४ हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले.

याप्रकरणी बाळू जगन्नाथ वडजे (रा. उमरगा चिवरी) यांनी नळदुर्ग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. दि. ५ ते ६ जूनदरम्यान ही चोरी झाली. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस पुढील तपास करीत आहेत.

## विकसित भारत बिल्डकॉन स्पर्धेत उमरगा जि.प. हायस्कूलचा जिल्ह्यात प्रथम क्रमांक

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.७ जून -**

येथील आयएसओ मानांकित जिल्हा परिषद हायस्कूलच्या विद्यार्थिनींनी विकसित भारत बिल्डकॉन २०२५ स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. शाळेतील वैष्णवी केदारे, पलक वरवटे, खुशी शिरसले आणि पूजा मोरे यांच्या टीमने सादर केलेल्या एम्पॉवरिंग गर्ल्स या संकल्पनेला धाराशिव जिल्ह्यात प्रथम क्रमांक प्राप्त झाला. या यशाबद्दल धाराशिव जिल्हा परिषदेच्या उपाध्यक्षा तथा शिक्षण सभापती उषाताई गायकवाड यांच्या हस्ते विद्यार्थिनींचा सत्कार करण्यात आला.

यावेळी माजी खासदार रवींद्र गायकवाड, नगराध्यक्ष किरण गायकवाड, शिवाई गायकवाड, सदानंद शिवदे पाटील, प्रदीप मदने, मुख्याध्यापक पद्माकर मोरे, नागेश स्वामी, सोनाली मुसळे आदी उपस्थित होते.

केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या शालेय शिक्षण व साक्षरता विभागाच्या मार्गदर्शनाखाली अटल इनोवेशन मिशनद्वारे आयोजित विकसित भारत बिल्डकॉन २०२५ या राष्ट्रीय नवोन्मेष स्पर्धेत देशभरातील विद्यार्थ्यांचा मोठा सहभाग नोंदविण्यात आला होता. या स्पर्धेला गिनीज वर्ल्ड रेकॉर्डकडून जगातील सर्वात मोठी नवोन्मेष स्पर्धा म्हणून गौरविण्यात आले आहे.

धाराशिव जिल्ह्यातून ३७६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यामध्ये वैष्णवी केदारे हिने जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावत विशेष यश संपादन केले. राष्ट्रीय स्तरावरील विजेत्यांना रोख पारितोषिक, प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह प्रदान करण्यात येणार आहे.

मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील नऊ टीमने या स्पर्धेत सहभाग घेतला होता. विज्ञान शिक्षक विद्यानंद सुत्रावे आणि अटल तालुका समन्वयक ताजोद्दीन सरवडे यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.

या स्पर्धेचे परीक्षक म्हणून डॉ. अशोक हुंबे व रवींद्र स्वामी यांनी काम पाहिले.

विद्यार्थिनींच्या या यशाबद्दल आमदार प्रवीण स्वामी, जिल्हा परिषद अध्यक्षा अर्चनाताई पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियवंदा म्हाडदळकर, शिक्षणाधिकारी सुधा साळुंके, डॉ. रविंद्र खंदारे, दिनकर होळकर, दत्तात्रय लांडगे, भारत देवगुडे, आकांक्षा चौगुले, अमोल राजपूत, शिला मुदगडे तसेच शाळा व्यवस्थापन समिती व शिक्षकवृंद यांनी अभिनंदन केले.

### ज्येष्ठ पत्रकार बळीराम जगताप (गुरूजी) यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.७ जून -**

वाशी शहरातील माजी शिक्षक, दैनिक तरुण भारतचे प्रतिनिधी तथा ज्येष्ठ पत्रकार बळीराम लक्ष्मणराव जगताप (वय ८६) यांचे शनिवारी (दि. ६ जून) सायंकाळी राहत्या घरी अल्पशा आजाराने निधन झाले.



बळीराम जगताप हे वाशी शहरातील सामाजिक, शैक्षणिक व सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेत असल्याने शहरात सर्वपरिचित होते. त्यांच्या निधनाने वाशी परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. रविवारी सकाळी १० वाजता तांदूळवाडी रोडवरील सार्वजनिक स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन सुना, एक मुलगी, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने पत्रकारिता, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील एक ज्येष्ठ व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले आहे.

### थकीत ऊस बिलासाठी शेतकऱ्यांचे बेमुदत आंदोलन; १२ दिवस उलटूनही दखल नाही



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ जून -**

गोकुळ शुगर लिमिटेड, धोत्री यांच्या थकीत ऊस बिलाच्या मागणीसाठी धाराशिव व सोलापूर जिल्ह्यातील शेतकरी सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत ठिय्या आंदोलन करत आहेत. आंदोलनाला तब्बल १२ दिवस उलटूनही शासन व प्रशासनाकडून ठोस दखल घेतली जात नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

ऊस बिल वेळेवर न मिळाल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नियोजन विस्कळीत झाले असून शिक्षण, विवाह, कर्जफेड आणि शेतीखर्चावर परिणाम होत असल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले. थकीत बिलामुळे अनेक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत.

शेतकरी नेत्यांनी ऊस बिल निश्चित कालावधीत अदा करण्याचा नियम लागू करावा तसेच विलंब करणाऱ्या साखर कारखान्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. आंदोलनस्थळी जय जवान, जय किसानच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला असून लोकप्रतिनिधींनी या प्रश्नात तातडीने लक्ष घालावे, अशी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

## नळदुर्ग बसस्थानक परिसरात अवैध प्रवासी वाहतुकीविरोधात धडक मोहीम

**एसटीच्या उत्पन्नाला फटका देणाऱ्या वाहनांवर कारवाई...**

### १५ जूनपर्यंत विशेष अंमलबजावणी अभियान

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.७ जून -**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या उत्पन्नाला फटका देणाऱ्या तसेच प्रवाशांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण करणाऱ्या अवैध प्रवासी



वाहतुकीविरोधात राज्य सरकारने विशेष मोहीम हाती घेतली आहे. परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्या आदेशानुसार ५ ते १५ जून २०२६ या कालावधीत राज्यभर विशेष अंमलबजावणी मोहीम राबविण्यात येत असून धाराशिव जिल्ह्यात या मोहिमेची सुरुवात नळदुर्ग बसस्थानकापासून करण्यात आली आहे.

उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर खंडपीठाच्या आदेशानुसार बसस्थानकाच्या २०० मीटर परिसरात अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर लक्ष ठेवून कठोर कारवाई करण्यात येणार आहे. नियमभंग करणाऱ्या वाहनांवर स्थानिक पोलिसांच्या मदतीने दंडात्मक कारवाई केली जाणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. या मोहिमेअंतर्गत धाराशिवचे विभाग नियंत्रक अजय पाटील, विभागीय वाहतूक नियंत्रक माधुरी जाधवर, सुरक्षा दक्षता अधिकारी श्रीधर नेहरकर, सुरक्षा पर्यवेक्षक संकेत माळी, प्रमोद गायकवाड, आगार व्यवस्थापक महेश रामपुरे आणि वाहतूक नियंत्रक महेश डुकरे यांनी नळदुर्ग बसस्थानक परिसरात अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई केली.

यापुढेही ही मोहीम सुरू राहणार असून बसस्थानकाच्या २०० मीटर परिसरात अवैध प्रवासी वाहनांना प्रवेश दिला जाणार नाही, असे विभाग नियंत्रक अजय पाटील यांनी सांगितले. प्रवाशांना सुरक्षित, अधिकृत आणि विश्वासार्ह सेवा उपलब्ध करून देणे तसेच एसटी महामंडळाचे उत्पन्न वाढविणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी नमूद केले.

## विंड वर्ल्डच्या आश्वासनाला १५ दिवस उलटले; शेतकरी व वाहनधारकांचे थकीत पैसे अद्याप प्रलंबित

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.७ जून -**

वाशी तालुक्यातील मसोबाचीवाडी परिसरातील विंड वर्ल्ड पवनचक्की कंपनीने शेतकरी व स्थानिक वाहनधारकांचे थकीत देयके १५ दिवसांत अदा करण्याचे तोंडी आश्वासन दिले होते. मात्र, या आश्वासनाची अद्याप कोणतीही ठोस पूर्तता झालेली नसल्याचा आरोप संबंधित शेतकरी व वाहनधारकांकडून करण्यात येत आहे.

मसोबाचीवाडी, कडकनाथवाडी, वडजी आणि नांदगाव परिसरातील अनेक शेतकऱ्यांचे जमिनीचे भाडे तसेच वाहनधारकांचे भाडे दीर्घकाळापासून थकीत असल्याचे सांगण्यात येत आहे. यासंदर्भात शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक, उपविभागीय अधिकारी तथा प्रांताधिकारी आणि तहसीलदार यांच्याकडे लेखी तक्रारी सादर केल्या आहेत.

दरम्यान, थकीत देयकांचा प्रश्न अद्याप निकाली निघालेला नसताना मसोबाचीवाडी येथील २२० केव्ही सबस्टेशन परिसरात पोलीस बंदोबस्तात कामे सुरू असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली असून, प्रथम थकीत देयके द्या, त्यानंतरच कामे सुरू करा, अशी भूमिका त्यांनी घेतली आहे. याबाबत कंपनीच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला असता अधिकृत माहिती मिळू शकली नाही. त्यामुळे कंपनीने दिलेल्या आश्वासनाचे नेमके काय झाले, याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शेतकऱ्यांचे प्रलंबित प्रश्न मार्गी न लावता कामे सुरू राहिल्यास परिसरात संघर्ष तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे कंपनी प्रशासन आता दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करते की नाही याकडे शेतकरी व नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## तुळजापूरच्या शिवभक्तांची रायगडवारी; गडदेवी शिरकाई मातेला मनाची साडी अर्पण

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.७ जून -**

छत्रपती छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त तुळजापूर येथील शिवभक्तांनी यंदाही रायगडवारी करत ऐतिहासिक परंपरेचे जतन केले. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही शिवप्रेमींनी रायगडावर जाऊन गडदेवी शिरकाई मातेला भावपूर्ण भक्तीभावाने मनाची साडी अर्पण केली.

कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी मंदिर आणि शिवरायांचे अतूट नाते स्मरणात ठेवत तुळजापूरातील शिवभक्त दरवर्षी रायगडावरील शिवराज्याभिषेक सोहळ्यात सहभागी होतात. यावेळी राज्याच्या सुख-समृद्धीसाठी तसेच सर्व शिवभक्तांच्या कल्याणासाठी प्रार्थना करण्यात



आली. रायगडावरील शिवराज्याभिषेक सोहळा पारंपरिक पद्धतीने आणि उत्साहात पार पडला. राज्याच्या विविध भागांतून आलेल्या हजारो शिवभक्तांच्या उपस्थितीत शिवरायांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले.

तुळजापूरच्या शिवभक्तांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवत शिवरायांप्रती आपली निष्ठा व्यक्त केली.

शिवरायांचे विचार हे आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी मार्गदर्शक आहेत, अशा भावना यावेळी शिवप्रेमींनी व्यक्त केल्या. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयघोषाने रायगड परिसर दुमदुमून गेला, तर तुळजापूरच्या शिवभक्तांच्या रायगडवारीने इतिहास, श्रद्धा आणि शिवभक्तीचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला.

लातूर
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## १२ लाभार्थ्यांवर बिनटाका कुटुंबकल्याण शस्त्रक्रिया

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ७ जून : तालुक्यातील तांदुळजा येथे दि.४ जून रोजी जिल्हा परिषद आरोग्य विभाग व प्राथमिक आरोग्य केंद्र तांदुळजा यांच्या संयुक्त विद्यमाने प्रायोगिक तत्त्वावर पहिल्यांदाच बिनटाका कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात १२ लाभार्थ्यांवर शस्त्रक्रिया करण्यात आली.

या शिबिराचे उद्घाटन जि. प. सदस्य श्रीकांत माने, पं. स. सदस्या शरयू गायकवाड, जनक गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. रामसिंग पवार यांच्या मार्गदर्शनाखाली वैद्यकीय अधिकारी डॉ.

सतिष बावणे व डॉ. यशवंत दहिफळे यांच्या नियोजनाने तांदुळजा, चिंचोली ब. परिसरातील १२ लाभार्थ्यांवर यशस्वी बिनटाका कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया करण्यात आल्या. या शिबिरासाठी तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयातील आरोग्य सहाय्यक मनगुरे डी डी, काळे बी. एम, चौंडे जे. बी, बोयने.व्ही.व्ही.समुदाय आरोग्य अधिकारी तुषार गायकवाड, आरोग्य सेवक व्यंकटेश काळे, कदम व्ही.ए., ससाने एस.डी, चोले आर.जी., सचिन भोसले, शिंदे एस. जी, वेदपाठक ए. एस, कदम ए. एस, दाणे एम.बी, अ वेदपाठक.ए.एस., कदम.ए.एस. आदींनी परिश्रम घेतले.



# विविध वृत्त...

## किशोर महाराज जाधव यांच्यावर गुन्हा दाखल



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ७ जून : तालुक्यातील खंडापूर येथील अखंड हरिनाम सप्ताहात कोट्यवधी रूपयाच्या देणग्या गोळा करून हिशेब न देताच पलायन केलेल्या तथाकथित किशोर महाराज जाधव याच्यावर अखेर फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे. लातुरात भ्रष्टाचार विरोधी वारकरी संपद्राय कृती समितीने सतत पाठपुरावा करून ते धसास लावले आहे. कृती समितीने नुकतेच त्यासाठी २ दिवसांचे उपोषण केले. या आंदोलनाला अखेर यश आले असून या कथित महाराजाला पोलिसांनी आता त्वरित अटक करून लाखो भाविकांना न्याय मिळवून द्यावा, अशी कृती समितीची मागणी आहे.

खंडापूर येथे यंदा फेब्रुवारी मार्च महिन्यात पार पडलेल्या मराठवाड्यातील संतांच्या भव्य उत्सव सोहळ्यात जमा झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या देणगीच्या गैरव्यवहार प्रकरणी तथाकथित महाराज, उत्सवाचा मुख्य आयोजक किशोर धोंडीराम जाधव (शिवणीकर), त्याचा कथित सहकारी सोनवणे (अहिल्यानगर) व इतर काही सहकाऱ्यांविरुद्ध, अपहार आणि धमकीसंदर्भातील एम.आय. डी. सी. पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणाने वारकरी संप्रदायात मोठी खळबळ उडवून दिली आहे.

## 'चन्नबसवेश्वर फार्मसी'च्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश





तभा वृत्तसेवा

लातूर दि. ७ जून : येथील चन्नबसवेश्र्वर फार्मसी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आणखी एक यशस्वी टप्पा गाठला असून कृष्णा पाटील आणि मन्मथ पळसकर यांची EVERSURE POLY-BOND PVT. LTD. या नामांकित कंपनीमध्ये TRAINEE EXECUTIVE पदासाठी निवड झाली आहे.

यावेळी प्रशिक्षण व प्लेसमेंट सेलचे समन्वयक नारागुडे अमोल यांनी विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल आनंद व्यक्त करताना सांगितले की, 'विद्यार्थ्यांना उद्योगाभिमुख प्रशिक्षण, कौशल्य विकास आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी महाविद्यालय सातत्याने प्रयत्नशील आहे. विद्यार्थ्यांचे हे यश संपूर्ण महाविद्यालयासाठी अभिमानाची बाब आहे.

## दुचाकीची धडक; एक जण गंभीर जखमी

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ७ जून : येथील लोकमान्य टिळक चौक (अशोक हॉटेल) ते महात्मा गांधी चौक रस्त्यावर भरधाव दुचाकीने दिलेल्या धडकेत एकजण गंभीर जखमी झाला आहे. या प्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी संदीप हतगुडे यांच्या दुचाकीला आरोपीने त्याच्या ताब्यातील एमएच २४, बीई २०२१ हयगयीने चालवून पाठीमागुन जोरात धडक दिली. या अपघातात फिर्यादीच्या डाव्या हाताला गंभीर दुखापत झाली आहे. अधिक तपास पोलीस हवालदार शेख करीत आहेत.

## बस स्थानकासमोरील वाहतूककोंडी सोडवावी

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ७ जून : शहरातील मध्यवर्ती बसस्थानकासमोर वाहतूक कोंडी ही नित्याची झाली आहे. महात्मा गांधी चौक ते गंजगोलाई हा रस्ता वाहूकीसाठी एकेरी आहे. महात्मा गांधी चौकातून गंजगोलाईकडे जाता येते. परंतू, गंजगोलाईकडून महात्मा गांधी चौकाकडे वाहने येत आहेत. ही वाहने मध्यवर्ती बसस्थानकासमोर एकमेकांसमोर येतात आणि वाहतूक कोंडी होत आहे.

## निवडणुकाच नको, ही सत्ताधाऱ्यांची मानसिकता : आ. अमित देशमुख



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ७ जून : सर्वच निवडणुका साम-दाम-दंडाचा वापर करून बिनविरोध करण्याचा सत्ताधाऱ्यांचा सपाटा सुरू आहे. मागील आठ दिवसांत महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये पडद्यामागून जे सुरू आहे, ते संपूर्ण देश उघड्या डोळ्यांनी पाहत आहे. निरपेक्ष - निवडणुका होणे हा लोकशाहीचा आत्मा - आहे. तोच आत्मा सत्ताधाऱ्यांकडून - काढून घेण्याचा प्रयत्न होत आहे. मग लोकशाही कशी जिवंत राहणार, असा - उद्विग्न सवाल माजीमंत्री आ. अमित देशमुख यांनी पत्रकार परिषदेत उपस्थित केला.

उस्मानाबाद-बीड-लातूर स्थानिक स्वराज्य - संस्था निवडणुकीत्त आयोजित पत्रकार परिषदेत - ते बोलत होते. पुढे ते म्हणाले, निवडणुकाच होऊ नयेत, यासाठी सत्ताधारी प्रयत्न करीत आहेत.

त्यासाठी विरोधकांवर वेगवेगळ्या प्रकारे दबाव आणण्याचा प्रयत्न करीत आहेत. पडद्यामागच्या राजकारणात काय घडतंय, हे संपूर्ण देश पाहतोय. परंतु, सरकारकडून सुरू असलेले हे दबावतंत्र लोकशाहीसाठी घातक आहे. लोकशाही जिवंत ठेवायची असेल तर पारदर्शक वातावरणात निवडणुका होऊ देणे गरजेचे असल्याची अपेक्षा आ. देशमुख यांनी यावेळी व्यक्त केली.

पत्रकार परिषदेस खासदार डॉ. शिवाजी काळगे, महापौर जयश्री सोनकांबळे, महेश देशमुख, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके, जितेंद्र देहाडे, धाराशिव काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष उमेशराजे निंबाळकर, बीडचे राहुल सोनवणे, काँग्रेसचे लातूर शहराध्यक्ष डॉ. शिवाजी जवळगेकर, उपमहापौर ॲड. स्नेहल उटगे उपस्थित होते.

## नीट पेपरफुटी प्रकरणी शिक्षणमंत्र्यांनी राजीनामा देण्याची मागणी



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ७ जून : नीट २०२६ परीक्षेतील कथित पेपरफुटी, शिक्षण व्यवस्थेतील वाढता भ्रष्टाचार, शिक्षणाचे बाजारीकरण, रखडलेल्या शासकीय नोकरभरत्या याकडे केंद्र व राज्य सरकारचे दुर्लक्ष होत आहे. विद्यार्थ्यांच्या प्रश्नावर केंद्र सरकार - अपयशी ठरले असून त्यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी कॉक्रोज जनता - पार्टी, विद्यार्थी पालक मंच व संविधानप्रेमी नागरिकांच्या वतीने निवेदनाद्वारे राष्ट्रपती महोदया यांना जिल्हाधिकारी लातूर यांच्यामार्फत निवेदन सादर करण्यात आले. यावेळी विक्रांत शंके, संविधान प्रेमी नागरिक मंचचे उदय गवारे, सामाजिक कार्यकर्ते विनायकराव पाटील, कॉम्रेड विश्र्वंभर भोसले, पांडुरंग देडे, गणेश कल्लुरकर उपस्थित होते.

## मनपातर्फे आयोजित सायकल रॅलीला मोठा प्रतिसाद



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ७ जून : जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने दि. ६ जून रोजी शहरात एका भव्य 'सायकल रॅली' चे आयोजन करण्यात आले होते. वाढते प्रदूषण रोखणे आणि पर्यावरण संवर्धनाबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

या आरोग्यदायी आणि पर्यावरणपूरक उपक्रमात 'लातूर सायक्लिस्ट ग्रुप'च्या सदस्यांनी आणि महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने आणि उत्साहाने सहभाग नोंदवला. सायकल रॅलीचा शुभारंभ लातूरचे महापौर जयश्रीताई सोनकांबळे आणि लातूर महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. मान्यवरांनी हिरवा झेंडा दाखवून रॅलीला सुरुवात केली व स्वतःही या उपक्रमात सहभाग नोंदवून वाढवला.

उपस्थितांचा महानगरपालिकेच्या मुख्य इमारतीपासून सुरू झालेली ही रॅली शहरातील प्रमुख मार्गावरून मार्गस्थ झाली.

रॅली लातूर शहर महानगरपालिका, महात्मा गांधी चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, आर. जे. कॉम्प्लेक्स, औसा रोड येथून यू-टर्न घेउन पुन्हा छत्रपती शिवाजी महाराज चौक, ५ नंबर चौक येथून यू-टर्न घेउन समारोप लातूर शहर महानगरपालिका कार्यालयात करण्यात आला.

पर्यावरण वाचवण्याचा आणि आरोग्याप्रति सजग राहण्याचा संदेश देणाऱ्या या रॅलीने संपूर्ण शहराचे लक्ष वेधून घेतले. लातूरकरांनीही या सायकल रॅलीचे स्वागत करत महानगरपालिकेच्या या स्तुत्य उपक्रमाचे मोठे कौतुक केले.

## शिवराज्याभिषेक दिनानिमित्त जिजाऊ ब्रिगेडने केले वृक्षारोपण



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ७ जून : शिवराज्याभिषेक दिन आणि जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून जिजाऊ ब्रिगेडच्या वतीने वृक्षारोपण करून छत्रपती शिवरायांना अभिवादन करण्यात आले. यावेळी शिवरायांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. उपस्थितांनी वृक्षांचे संगोपन करण्याची शपथ घेतली. या जिजाऊ ब्रिगेड जिल्हाध्यक्षा अर्चना पाटील, विभागीय अध्यक्ष रंजना चव्हाण, कार्याध्यक्ष योगिता ठाकूर, कोषाध्यक्ष मीराताई देशमुख, उपाध्यक्ष अनिता मुदुले, संघटक जयश्री सावंत, जिल्हा समन्वयक जयश्री हांडे, सदस्य तनुजा तळेकर, मराठा सेवा संघाचे वैभव तळेकर, नवघरे, प्रशांत कदम आदी उपस्थित होते.

## 'आरसीसी' क्लासेस बंद करण्याच्या मागणीसाठी ट्युशन एरियात मोर्चा




तभा वृत्तसेवा

लातूर दि. ७ जून : नीट पेपरफुटी प्रकरणी अटकेत असलेल्या प्रा. शिवराज मोटेगावकर यांचे 'आरसीसी' क्लासेस बंद करण्याच्या मागणीसाठी लातुरातील विविध पक्ष संघटनानी दि. ६ जून रोजी ट्युशन एरियातून मोर्चा काढून 'आरसीसी' क्लासेस समोर मोटेगावकर, कुलकर्णी आणि डॉ. शिरूरे यांच्या विरोधात घोषणाबाजी केली.

तसेच प्रा. प्रल्हाद कुलकर्णी, प्रा. शिवराज मोटेगावकर व डॉ. शिरूरे यांना कडक शिक्षा मिळावी अशी मागणीदेखील यावेळी करण्यात आली असून येत्या २१ तारखेपर्यंत 'आरसीसी' क्लासेसला कांही करणार नाही मात्र २१ तारखेनंतर 'आरसीसी' क्लासेस फोडून टाकू, असा ईशारा यावेळी आंदोलनकर्त्यांनी दिलाय. यावेळी 'आरसीसी' क्लासेस समोर मोठया प्रमाणात पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ७ जून : जागतिक पर्यावरण दिन निमित्ताने अल्ट्राटेक सिमेंट कंपनी व असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग इंजिनियर्स आर्किटेक्ट आणि सिव्हिल ड्राफ्ट्समनच्या संयुक्त विद्यमाने अंबेजोगाई रोड परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. हरित लातूर सुंदर लातूर झाडे लावा झाडे जगवाचा असा संदेश देण्यात आला.

## आ. अमित देशमुख यांनी नागरिकांच्या घेतल्या भेटी



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ७ जून : राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी शनिवार दि. ६ जुन रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी लातूर शहरासह जिल्हाभरातून आलेल्या विविध संस्था पदाधिकारी, काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी नागरिक यांच्या भेटी घेऊन त्यांच्या अडीअडचणी समस्या समजून घेऊन त्यांच्या निमंत्रणाचा स्वीकार करून संबंधितांना पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सूचना केल्या.

यावेळी माजी आमदार वैजनाथ शिंदे, लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्षअभय साळुंखे, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रा. डॉ. शिवाजी जवळगेकर, लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संतोष देशमुख, लातूर कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, ट्वेंटीवन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, विलास को ऑपरेटिव्ह बँकेचे चेअरमन किरण जाधव, व्हाईस चेअरमन समद पटेल, यशवंतराव पाटील, विजयकुमार साबदे, एस. आर. पाटील, सय्यद मोइनउल्ला, विकास कांबळे, विकास देशमुख, व्यंकटराव गर्जे, व्यंकटेश पुरी, गोविंद देशमुख, सचिन मस्के, अल्लाबक्ष शेख, सुनील बसपुरे, राजकुमार कत्ते, गणेश एस. आर. देशमुख, विष्णुदास धायगुडे, सुरेश चव्हाण, एकनाथ पाटील, शेषेराव नंदगावे, छाया मस्के, उत्तम जाधव, मिनीनाथ मगर, संजय राठोड, लिंबा जाधव, सुनील राठोड, हुसेनबी शेख, भगवान डोंगरे आदिसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.

## छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन प्राचार्य डॉ. गव्हाणे यांनी केले मार्गदर्शन

# 'शाहू'मध्ये ३५३ वा शिवराज्याभिषेक सोहळा उत्साहात साजरा




तभा वृत्तसेवा

लातूर दि. ७ जून : येथील राजर्षी शाहू महाविद्यालय येथील ग्रंथालय व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करत अभिवादन करून त्यांचा ३५३ वा शिवराज्याभिषेक सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे होते. यावेळी उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, डॉ. संभाजी पाटील, ग्रंथपाल प्रा. सूर्यकांत मस्के, डॉ. महेश वावरे, प्रा. सूर्यकांत चव्हाण, डॉ. सचिन कुलकर्णी, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. प्रकाश रोडिया, प्रा. विजय गवळी, डॉ. शिवराज काचे, डॉ. किशोर शिंदे, प्रा. भैरवनाथ गोरडे, प्रा. नितीन पांचाळ, प्रा. महादेव भाताडे, प्रा. प्रशांत जोशी, प्रा. जिवन गायकवाड, प्रा. सुचित्रा सोनवणे, प्रा. प्रांजली कुंभार, प्रा. स्वाती स्वामी, प्रा. अर्चना सावंत व महाविद्यालयातील इतर प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, 'शिवराज्याभिषेक सोहळा हा भारतीय इतिहासातील सर्वात अभिमानास्पद आणि सुवर्णक्षण मानला जातो. ६ जून १६७४ रोजी किल्ले रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला. या ऐतिहासिक घटनेमुळे स्वतंत्र 'हिंदवी स्वराज्याची' अधिकृत घोषणा झाली आणि महाराजांनी 'छत्रपती' पद धारण केले.

!! श्री दत्त प्रसन्न !!

## दै. तरुण भारत च्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!

## श्री सुभाष शुगर प्रा.लि., हडसणी
ता. हदगांव जि. नांदेड

## शिऊर साखर कारखाना लि., वाकोडी
ता. कळमनुरी जि. हिंगोली




प्रति वर्ष 2 कोटी युनिट वीज महावितरणाला पुरवठा

श्री सुभाष शुगर कारखान्याच्या माध्यमातून विज निर्मिती सुरू व्हावी असा संकल्प कारखान्याचे चेअरमन श्री सुभाषराव लालासाहेब देशमुख व कार्यकारी संचालक श्री. सुशिलकुमार देशमुख यांचा होता.त्याच अनुषंगाने त्यांच्या अथक परिश्रमातून बगॅस वर प्रक्रिया करून 14.90 मेगावॉट विद्युत निर्मितीचा प्रकल्पाचे काम मागील तीन वर्षांपूर्वी पूर्ण होऊन उत्पादीत केलेली विज महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीस विक्री केल्या जात आहे.

लवकर होणार सी. एन. जी. चे उत्पादन

### कारखान्याच्या इतिहासात श्री. सुभाष शुगरचे विक्रमी गाळप

सन 2026-27 9 हजार हेक्टर उसाची नोंद.
मागील हगांमात 5 लाख 80 हजार मेट्रीक टन एवढा उस गाळप
सन 2026-27 वर्षासाठी 7 लाख मेट्रीक टन गाळपाचे उद्दिष्ट.

### श्री सुभाष रुरल कॉ-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. नांदेड
मुख्य शाखा: हडसणी, ता. हदगाव, जि. नांदेड




शिऊर साखर कारखाना वाकोडी डिस्टीलरी प्लॅन्ट कार्यान्वित.



उस उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी श्री सुभाष शुगर प्रा.लि. हडसणीचे अध्यक्ष श्री सुभाषराव लालासाहेब देशमुख यांच्या हस्ते श्री सुभाष रुरल को-ऑपरेटिव्ह क्रडिट सोसायटी लि. ची स्थापना करण्यात आली आहे.

शिऊर कारखाना येथे बायो सीबीजी 16.5 टिपीडी प्रकल्पाचे भूमिपूजन कारखान्याचे अध्यक्ष सुभाषराव लालासाहेब देशमुख यांच्या हस्ते झाले होते त्याचे काम जवळपास 70 टक्के पूर्ण झाले असून हे प्रकल्प लवकरच कार्यान्वीत होणार आहे.

### : कारखान्याची प्रमुख उद्दिष्ट्ये :

- पांढरी शुभ्र व दर्जेदार साखर निर्मिती करणे.
- ऊस उत्पादक शेतक-यांना जास्तीत जास्त ऊस दर देणे.
- सवलती दरामध्ये ऊस उत्पादक शेतकरी यांना प्रेसमड वाटप करणे
- श्री सुभाष शुगर प्रा.लि.हडसणी येथे सी.एन.जी चे उत्पादनाचे उद्दिष्ट.
- शिऊर साखर कारखाना वाकोडी डिस्टीलरी चाचणी यशस्वी.
- ऊस उत्पादक शेतकरी यांच्या सहकार्याने जास्तीत जास्त (उच्चांक) गाळप करणे.



श्री.सुभाषराव लालासाहेब देशमुख
( चेअरमन )



श्री. सुशिलकुमार सुभाषराव देशमुख
( कार्यकारी संचालक )